# सध्या तरी शेवट गोड

## ( दोन अंकी नाटक )

चं. प्र. देशपांडे



# सध्या तरी शेवट गोड

## (दोन अंकी नाटक)

**-- चं.प्र. देशपांडे**

**--- अंक पहिला ---**

श्री. वसंतराव देवकुळे ( सुमारे ५७ ) या बांधकाम खात्यातील सरकारी इंजिनियरचा बंगला, थोडेफार वैभव असलेला. पगाराहून अधिक कमाईची साक्ष देणारा. समोर दिवाणखान्यात येण्याचे प्रवेशव्दार. उजव्या बाजूला समोरच्या भिंतीलाच आत जाण्याचे एक दार. वसंतरावांच्या आईची खोली तिकडे आहे. उजव्या बाजूला एक व डाव्या बाजूला जरा मागे अशी इतर खोल्यांकडे जाण्याची दारे. प्रेक्षकांच्या बाजूला डाव्या हाताला देवघर. देवघराच्या दाराच्या ॲल्युमिनियमच्या सळ्या दिसतात. प्रवेशव्दाराच्या डाव्या हाताला एक मोठी खिडकी. खिडकीला व दारांना उंची पडदे. खिडकीतून बाहेरचा बागबगीचा दिसतो. घरात एकदोन शोभाचित्रे, सुमारे दीड फूट उंचीचे एखाद्या देवाचे/देवीचे शिल्प ( लोखंडी वा दगडी ), पुस्तकांचे छोटे रॅक, टेलिफोन व चांगले फर्निचर,गालीचा. चांगली रंगसंगती.

पडदा उघडण्यापूर्वी वसंतरावांच्या आवाजात मंत्रपुष्प चालू असून संपत आले आहे. पडदा उघडल्यानंतर काही क्षणांनी मंत्रपुष्प व पूजा संपते. देवघराची दारे उघडी असून तिथून थोडा उदबत्तीचा वगैरे धूर बाहेर येतो आहे. समोर वसंतरावांच्या पत्नी शिल्पाताई ( सुमारे ५२ ) सचिंत बसल्या आहेत. उजव्या हाताला त्यांची भाची संगीता ( सुमारे २० ) इंजिनियरिंगच्या अभ्यासाचे एक जाडे पुस्तक वाचत आहे. काही क्षण असे जातात. नंतर उजवीकडच्या समोरच्या दारातून वसंतरावांच्या विधवा आई ( सुमारे ७८ ) येतात. शुभ्र नऊवारीत. स्वच्छ, भारदस्त व्यक्तिमत्व.

आई : झाली का रे पूजा वसंता -- तुला सांगते, एक शुभशकून घडलाय आज. माझं लक्ष्मीस्तोत्र सापडत नव्हतं ना, तर आज पहाटे स्वत: लक्ष्मी माझ्या स्वप्नात आली आणि म्हणाली --

’महाभारत’ वाच. माझं आटोपल्यावर ’ महाभारत’ घेतलं वाचायला तर त्याच्यात लक्ष्मीस्तोत्र सापडलं ! ठेवलं गेलं असेल चुकून नाहीतर खुणेसाठी ! पण सापडलं ! शुभशकूनच आहे हा ! कृपा आहे आपल्यावर ! काही काळजी करू नका ! आज घडेल काहीतरी चांगलं ! ( देवघरातून काही प्रतिक्रिया नाही. समोर बसलेल्यांचीही काही प्रतिक्रिया नाही. ) शिल्पा, काही काळजी करू नकोस. मी सांगते तुला. ( शांतता. ) बरं, तीर्थप्रसाद वाटायला वसंता बाहेर आला की सांगा मला. ( स्वत:शीच --) पूजेनंतरचा साष्टांग नमस्कारच पंधरा मिनिटं चालतो त्याचा ! ( जाऊ लागतात पण दारापासून पुन्हा मागे येतात. ) काही वाईट होणार नाही. आपण कुणाचं काही वाईट केलेलं नाही. वसंताचं तर पूजाअर्जा,अथर्वशीर्ष, व्यंकटेशस्तोत्र यांच्यात कधीही खंड नाही. दानधर्म आहे, तीर्थयात्रा होतात. सत्यनारायण होतात. पूजेला बसल्यावर काय लक्ष्मीनारायणासारखे शोभून दिसता तुम्ही दोघं ! ज्या घरात हे सगळं आहे तिथं काही वाईट घडेलच कसं ! शिवाय शिल्पा, तुझाही देवधर्म, व्रतवैकल्यं काही कमी नाहीत. वाया कशी जाईल ही सगळी पुण्याई ! किती लोकांना जेवूखाऊ घातलंय तुम्ही याची गणती तरी करता येईल का ! मदतीचा हात तर सदोदित पुढे ! हा जिव्हाळा महत्त्वाचा असतो रे बाबा आयुष्यात -- दुसरं काही नाही. आणि अनंता तर नवसानं झालेला आहे. देवाचा प्रसादच आहे तो. त्याचं काही वाईट व्हायचं नाही. काही काळजी करू नका तुम्ही. जाताना मला म्हणाला होता तो की आजी, म्हणे माझं एक महत्वाचं काम आहे, होईल की नाही ते सांग. मी म्हटलं ‘ होईल ‘ ! कसलं काम होतं गं शिल्पा त्याचं ?

शिल्पाताई: माहीत नाही.

आई : असू दे. अनंता काही वावगं वागणारा मुलगा नाही. त्याचं पाऊल वेडंवाकडं पडणारच नाही. देवकुळ्यांच्या घराण्याचा कुलदीपक आहे तो. वडीलधाऱ्यांचा आदर करणारा, सगळ्यांशी प्रेमानं वागणारा, नियमानं रोज देवळात जाऊन येणारा मुलगा आहे तो. शिवाय हुशार आहे. नोकरी चांगली मिळालीय. जबाबदार आहे. काही वाईट व्हायचं नाही. तो येईल. त्याचं लग्न होईल. मग लौकरच छोटा रघुनंदन येईल घरात. आनंद होईल सगळा. काही वाईट घडायचं नाही. शिवाय आज शुभशकून घडलाय. काही काळजी करू नका. ( बसत --) संगीता, पाणी घे गं जरा प्यायला.

संगीता : हं -- ( वाचन चाललेला पॅरॅग्राफ संपवून मग उठते. उजव्या दारातून जाऊन पाण्याचा ग्लास घेऊन येते. आईंना देते. पुन्हा वाचन चालू. )

आई : (पाणी पिऊन झाल्यावर शिल्पाताईंकडे काही क्षण पाहतात. मग खाजगीत बोलल्याप्रमाणे --) वसंता काय म्हणतोय ?

शिल्पाताई: अजून तसं काहीच नाही.

आई : हे बघ, माझं ऐक म्हणावं. कितीही पुण्यशील असलो तरी पामर माणसं आपण. संसाराच्या हवे-

नकोत अडकलेली. उगीच आता उशीर नको करूस म्हणावं. शोधाशोध सुरू करायला हवी आता. संगीता, माझ्या बोलण्याचा अडथळा होत नाहीय ना तुला ?

संगीता : नाही, नाही. उलट मलाच अपराधी वाटतंय. ( शिल्पाताईंना--) मी तरी काय करू सांग मावशी ! प्रायव्हेट कॉलेजची आवाक्याबाहेरची फी भरून मला इथं ठेवलंय तर मला यात कमी पडून चालेल का ? त्यामुळं अजिबात वेळ घालवू शकत नाही मी. नाहीतर घरात असा गंभीर प्रश्न असताना मी वाचत बसणंसुध्दा विचित्र आहे. पण माझाच हट्ट होता इंजिनियरिंगला जायचा. आता कुठल्याही परिस्थितीत हे पार पाडणं हेच मला नजरेसमोर ठेवावं लागेल.

शिल्पाताई: अगं, पण कोण काय म्हणतंय तुला ? समजत का नाही आम्हाला ? पाहिजे तर आत जाऊन बस जा तू.

संगीता : तीर्थप्रसाद घेऊनच आत जावं म्हणून बसलेय मी इथं, नाहीतर काका स्वत: मला तिकडे येऊन तीर्थप्रसाद देतात -- ते अगदी ओशाळल्यासारखं होतं मला --

शिल्पाताई: बरं, बस मग. आणि असलं काही वाटून घेऊ नकोस. आणि तू काय करणार आहेस नाहीतरी ? तू इकडे नको लक्ष देऊस.

आई : ( शिल्पाताईंना --) नानासाहेबांना तरी विचार म्हणावं. काहीतरी सांगतील तरी.

शिल्पाताई: माझ्याही मनात तेच आहे. प्रश्नकुंडली मांडून ते जे सांगतात ते बरोबरच असतं. ऑफिसात जातील तेव्हा मी तेच सांगणार आहे यांना. म्हणजे संध्याकाळी येता येता जाऊन येतील.

आई : काय एकेक प्रसंग आणतोस रे बाबा परमेश्वरा ! ( देवघराकडे पाहून नमस्कार करतात.) आण बाबा ! प्रसंग आणणाराही तूच आणि त्यातनं सोडवणाराही तूच ! तुझी इच्छा बाबा !

( काही क्षण शांतता. मग वसंतराव देवघरातून बाहेर येतात. सोवळ्यात. ते पूजेचे पाणी ताम्हनातून तुळशीला घालायला चालले आहेत. थांबतात.)

वसंतराव : पोलीस कम्प्लेंट करायची का ? पाच दिवस होतायत आज. ( उजवीकडच्या दाराने बाहेर जातात. )

आई : पोलीसात कशाला म्हणतोय तो ?

शिल्पाताई: हरवलाय म्हणून. शोधण्यासाठी.

आई : अरे पण आधी आपले प्रयत्न करा की म्हणावं. आपल्या माणसांना सांगा. फोन करा.

( वसंतराव येतात. क्षणभर पाहून देवघरात जातात. पुन्हा बाहेर येताना तीर्थप्रसाद घेऊन येतात. प्रथम आईपुढे येतात.)

वसंतराव : हं ! ( आई तीर्थप्रसाद घेतात. देवघराच्या दिशेने नमस्कार करतात.)

आई : वसंता, तू एकदा नानासाहेबांना का विचारत नाहीस ?

वसंतराव: ( शिल्पाताईना तीर्थप्रसाद देत --) माझ्या मनात तेच आहे. संध्याकाळी येताना मी त्यांना भेटूनच येणार आहे.

आई : आपल्याला कळत नाही तेव्हा अशा थोर पुरुषांचा सल्ला घ्यावा बाबा !

शिल्पाताई: नानासाहेब काय म्हणतात ते बघून मगच पोलिसात गेलं तर ? (तीर्थप्रसाद घेऊन नमस्कार करतात.)

वसंतराव : ( संगीताला तीर्थप्रसाद देत --) तेच बरं होईल. मलाही तसंच वाटतंय. उगीच घाईनं बेअब्रू नको. आणि संगीता, तू यात काही लक्ष देऊ नकोस. तुझं चालू दे ! अं ! जा !

संगीता : हो. ( ती तीर्थप्रसाद घेऊन, नमस्कार करून जाते ).

वसंतराव : तो ज्या अर्थी आईला म्हणाला होता की त्याचं काहीतरी महत्त्वाचं काम आहे, त्याअर्थी काळजीचं काही नसावं असं मला वाटतं. ( वसंतराव जाऊन तीर्थप्रसादाची भांडी देवघरात ठेवून येतात.)

शिल्पाताई: आपण अजून काही शोधायचे प्रयत्न सुरू केलेले नाहीत.

वसंतराव : या बाबतीत मी जरा गोंधळात आहे. संध्याकाळी नानासाहेबांचं मत विचारून ठरवू. नाहीतर निष्कारणच चर्चेचा विषय होईल सगळीकडे.

आई : बघ बाबा वसंता. आपण चर्चा नको म्हणायचं आणि पोराला काही बरंवाईट झालं तर नंतर पस्तावायची पाळी यायची, असं नको व्हायला.

वसंतराव : आई, आत्ता काहीही केलं तरी ते बरोबर किंवा चूक असणार आहे. काय घडतंय हे तर आपल्याला माहीत नाही आणि वागणं बरोबरच झालं पाहिजे असा आपला प्रयत्न आहे. आहे ते टिकवायचा प्रयत्न करायचीसुध्दा एक मर्यादा असेलच. पण ती नेमकी कुठपर्यंत आहे हेही आपल्याला माहीत नाही.

आई : नाही तर नंतर वेड्यात काढायची लोकं !

वसंतराव: ( जरा चिडून -- ) मग काय करावं असं तुझं म्हणणं आहे ? काय केलं पाहिजे हे तुला तरी नक्की समजतंय का ? आणि माझ्या डोक्यात जे जे विचार आहेत ते तुला माहीत आहेत का ?

आई : मी आपलं मायेनं बोलते बाबा ! शेवटी तूच ठरव काय ते !

वसंतराव : शेवटी जबाबदारी माझीच आहे, हे मला समजतंय.

शिल्पाताई: तुम्ही चिडू नका असे. शेवटी हा आपला सगळ्यांचाच प्रश्न आहे. निर्णय जरी तुम्ही घेणार असलात तरी, आम्ही काही तुम्हाला दोष देणार नाही.

वसंतराव : आणि दिलात तरी काय करणार ! परमेश्वराची इच्छा ! निष्कारणच असं विचित्र वागायचं अनंताला तरी काय कारण होतं !

शिल्पाताई: कळेपर्यंत शांतच राहावं लागेल ! ( काही क्षण जातात. मग वसंतराव उजव्या दारातून आत जातात. ) आपण काहीच जास्त बोलायला नको आता.

आई : तसंही राहवत नाही गं !

शिल्पाताई: त्यांची मन:स्थिती बरोबर नाही. मूळ प्रश्न राहयचा बाजूला आणि आपल्यातच चिडाचीड व्हायची !

आई : ( स्वत:शीच -- ) देवा, कशाला असले उद्योग करत असतोस रे बाबा ! कशाला जन्माला घालतोस माणसं आणि भोगायला लावतोस त्यांना हे सगळं ! ( काही क्षण. दोघीही स्वस्थ बसून. मग वसंतराव कपडे बदलून बाहेर येतात. ते ऑफिसला जायची तयारी करताहेत ).

शिल्पाताई: जेवायला वाढू ?

वसंतराव: नाही. मी काही खाणार नाही आज. मी देवाला साकडं घातलेलं आहे. आजच्या दिवसात मला पुढचा मार्ग तरी कळला पाहिजे किंवा तो परत तरी आला पाहिजे.

शिल्पाताई: ( दाटून आलेला उमाळा दाबत --) मीही खाणार नाही आज काहीही. मीही संकट घालते देवावर ! (आई शिल्पाताईंच्या जवळ सरकतात आणि त्यांच्या पाठीवर हाताने थोपटतात.)

आई : ( काही क्षणांनी --) मी सुध्दा आज दिवसभर जप करणार आहे. शिवाय सकाळी शुभशकून झालाय. देवावर भार टाका आणि शांत रहा. सगळं ठीक होईल. ( वसंतराव पुन्हा आत जातात, ब्रीफकेस घेऊन बाहेर येतात, मोजे, बूट घालू लागतात. )

शिल्पाताई: आज गुरुवार आहे.

वसंतराव: रात्रीचं भजन होईल. त्यात खंड पाडायचा नाही. आणि आलेल्या लोकांना यातली काही शंकासुध्दा येता कामा नये. ( काही क्षण. शिल्पाताईंना रडू फुटते. करडेपणाने --) रडारड आणि प्रदर्शन टाळा म्हणून सांगितलं मी ! ( क्षणभर पाहतात. ब्रीफकेस उचलतात. जातात. झटकन अंधार होतो. भजनवाद्यांचा दणका सुरू होतो. काही क्षण हे भजनवाद्यसंगीत चालू राहते. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा रात्रीचे भजन होऊन गेलेले आहे. वसंतराव कुर्ता - पायजम्यामध्ये, बुक्का लावलेले – दारातून, गेलेल्या लोकांना निरोप देताहेत. उजव्या हाताला मागे अनंत -- सुमारे २८ -- बसलेला, त्यालाही बुक्का लावलेला आहे. त्याचा चेहरा गंभीर. उजवीकडच्या एका दारातून शिल्पाताई बाहेर येतात. अधीरपणा, आनंद,काळजी असे मिश्र भाव. दुसऱ्या दारातून संगीता येते. उजवीकडच्या कोपऱ्यातल्या दारातून आई लगबगीने बाहेर येतात. शिल्पाताई पुढे अनंताकडे जात असताना वसंतराव आत येतात. त्यांना पाहून शिल्पाताई थबकतात. क्षणभर वसंतराव सगळ्यांच्याकडे पाहतात, मग दार लावून घेतात. अनंत जणू काही कुणाकडेच पाहात नसल्यासारखा गप्प बसून. अनंताच्या वागणूकीत पुरुषीपणाचा अभाव जाणवावा पण फार स्पष्ट नव्हे. थोडासा बायकीपणा.)

वसंतराव : ( पुढे येत, सावधपणे एकेक वाक्य --) तुझी वाट पाहण्याची आमची सहनशक्ती आज संपली असती. पण आज तू आल्यामुळं लोकांमधे चर्चेचा विषय व्हायचं टळलेलं आहे. भजन चालू असताना तू आल्यामुळं सगळ्यांसमोर काही बोलणं शक्य नव्हतं. ठीक आहेस नं ?( अनंत काहीच बोलत नाही. )

आपण एका खोलीत भाड्याच्या जागेत राहात होतो तेव्हापासूनच्या सगळ्या आठवणी तू गेल्यापासून डोक्यात गर्दी करून होत्या. काळजीनं आणि जागरणानं आजाऱ्यांसारखी अवस्था झालीय आमची. तरीही अजून आम्ही काहीच कुणाला दिसू दिलेलं नाही. संध्याकाळी येताना नानासाहेबांकडे जाऊन आलो. तू आज किंवा शनिवारी नक्की परत येशील असं ते म्हणाले होते. शनिवारपर्यंत जर तू आला नसतात तर जाहिरात, पोलीस तक्रार, मित्रमंडळी, नातेवाईक यांची मदत घेणं वगैरे चालू करावं लागलं असतं. असं का केलंस ? ( तो बोलत नाही. ) तुझ्या आजपर्यंतच्या वागण्यावरून हे असलं कुणालाच अपेक्षित नव्हतं. तू आईशी एक वाक्य याबद्दल बोलला होतास तेवढाच आम्हाला दिलासा होता. पण काय प्रॉब्लेम काय होता ? असं का वागलास ?

आई : अरे वसंता, ते नंतर बोल सगळं. अनंता, जेवण करून घे आधी. चल. ( तो तसाच निश्चल. )

शिल्पाताई: चहा करू ?

अनंत : काही नकोय मला. ( शिल्पाताईंना त्याच्याकडे पाहून भडभडून येते. हुंदका दाबत त्या खाली बसतात. संगीताचा चेहराही रडवेला झालेला.)

वसंतराव : जेवण झालंय का तुझं ?

अनंत : हो.

आई : ( त्याच्याजवळ जाऊन त्याच्या केसांवरून हात फिरवत -- ) कुठं गेला होतास बाबा तू -- मला विचारलंस काम होईल का आणि मी पण वेडी काही न विचारता सवरता हो म्हणाले --

शिल्पाताई: ( त्याच्या जवळ जात --) बरा आहेस नं ? (संगीताही थोडी पुढे येऊन उभी राहते. ) काहीच नकोय ?

अनंत : नकोय.

वसंतराव : मला वाटतं, तुम्ही तिघी आता आत जा. सगळेजण त्याला छेडत बसू नका. ( तिघीही आत जातात. वसंतराव सोफ्यावर बसतात. सिगरेट काढून शिलगावतात. झुरका मारतात. अनंत नुसता बसून. काही क्षण. मग -- ) तुला काही सांगायचं नसलं तर तसं सांग म्हणजे आम्ही विचारत तरी बसणार नाही. ( अनंत क्षणभर पाहतो. मग हाताने कपाळावरचा बुक्का पुसतो. मग रुमालाने पुसतो. उभा राहतो. )

अनंत : सांगावं तर लागेलच !

वसंतराव : हं --

अनंत : ( जरा वेगाने पुढे येत -- ) तुम्ही कारण आहात या सगळ्याचं ! तुम्ही ! ( वसंतराव जरा चमकून पाहतात पण जास्त आश्चर्य वा उत्सुकता दाखवत नाहीत. ) भाड्याच्या एका खोलीपासून ते या आलिशान बंगल्यापर्यंतचा तुमचा प्रवास ! ( काही क्षण ...)

वसंतराव: ( जरा जोराने --) कुणीही आडूनआडून काही ऐकायचं कारण नाहीय ! आपापल्या कामाला लागा. झोपा वाटलं तर ! पुन्हा सांगायला लावायचं नाही ! ( पुन्हा शांतता धारण करतात. अनंतकडे पाहतात. )

अनंत : तुम्ही एक भ्रष्टाचारी सरकारी इंजिनियर आहात आणि बांधकाम विभागात तुम्ही वर्षानुवर्षं हात मारत आलेले आहात हे सगळ्यांना कळतं ! पगारात एवढं जमत नसतं !

वसंतराव : एवढ्या वर्षांच्या नोकरीत माझ्यावर कधी कुठला आरोप आलेला नाही किंवा माझ्याकडे कुणी बोट दाखवलेलं नाही. पण ते असो. त्याचा काय संबंध ?

अनंत : पैसा जमवण्याच्या टेन्शनखाली तुम्ही सतत जगलेले आहात आणि तो मानसिक तणाव टाळण्यासाठी तुम्हाला सतत या धार्मिक अवडंबराची गरज पडत आलेली आहे. या दोन्ही गोष्टी तुमच्या जगण्यात विकृती आणत राहिल्या. तुम्ही ॲब्नॉर्मल झालात !

वसंतराव : म्हणजे एक प्रकारचा मनोरुग्णच म्हणायचा मी !

अनंत : म्हणूनच तुमचा पहिला मुलगा मृतावस्थेत जन्मला, मुलीचं लग्न होऊन चार वर्षं झाली पण तिला मूल नाही, आणि मी -- ( हुंदका फुटतो -- ) -- नपुंसक - नपुंसक आहे मी -- तुमच्यामुळे -- ( हमसून रडत राहतो. वसंतरावांना प्रचंड धक्का बसलेला आहे. ते अवाक्. नुसते पाहात राहतात. )

वसंतराव: ( अतिशय धिमेपणाने --) माझं मनोविश्लेषणही करायला हरकत नाही पण मला वाटतं आधी आपण प्रॉब्लेम काय आहे हे पाहिलं तर बरं होईल -- आणि नपुंसक वगैरे एकदम् असं म्हणायचं काही कारण नसतं -- हे काही --

अनंत : सगळी माहिती घेतलीय मी -- तपासण्या, डॉक्टरी सल्लेही झालेत -- ट्रीटमेंटनं बरं होईल का आणि किती काळ लागेल हे नक्की नाही -- मी ॲब्नॉर्मल आहे. घुमसटतोय मी गेले काही महिने. पण सांगणार कुणाला ? घरातले लोक म्हणजे तुमच्या लेखी नगण्य ! बोलणंच नाही ! हेच बाहेरचे कुणी आले की नुसती ओघवती वाणी !

वसंतराव : हे बघ, हे सगळं अचानक माझ्यासमोर येतंय -- ताबडतोब कदाचित मला काही बोलताही येणार नाही, पण तुला वाटतंय ते सगळं सत्यच धरून चालू नकोस. आणि ठिकठिकाणच्या बदल्या, त्यातला त्रास हे सगळं काय माझ्यासाठी चाललं होतं माझं ? आणि बऱ्याच वेळा एकटा असल्यामुळं ऐतिहासिक -- पौराणिक वाड्मय वाचायची सवय लावून घेतली मी ! त्यामुळंही घरातलं बोलणं कमी झालं असेल ! पुढं तू असं काही म्हणू नये म्हणून मी वाचनाऐवजी व्यसनात बुडवून घ्यायला हवं होतं ! किंवा नुसतं आढ्याकडे बघत पडून राह्यला पाहिजे होतं !

अनंत : तसे उपकार खूपच आहेत तुमचे आमच्यावर ! काकांची दोन्ही मुलं ब्रिलियंट निघाली ! आम्ही फक्त

बीकॉम -- बॉर्न कारकून -- ! अर्थात् आहे याच कंपनीत कारकुनी करत आयुष्य घालवलं तरी काही प्रॉब्लेम नाही एवढी बेगमी आहे आपल्याकडे !

वसंतराव : तुझ्या प्राब्लेमवर मी लगेच विश्वास ठेवू शकत नाही --

अनंत: : तुम्ही विश्वास ठेवायचा प्रश्नच नाही -- मी पिच्छाच धरलेला आहे या प्रश्नाचा ! ... आणि घरात विचार चाललाय माझ्या लग्नाचा !

वसंतराव : मला तू जर नीट सगळं सांगितलंस तर बरं होईल. मोठ्यात मोठ्या तज्ञाकडे आपण जाऊ.

अनंत : चौऱ्याऐंशी लक्ष योनींतून भटकल्यानंतर मला हा नरदेह प्राप्त झालेला आहे -- तुमच्या कृपेनं ! आता कसं करू याचं सार्थक ते सांगा ! ( काही क्षणांनी -- ) मित्रांबरोबर एकदा तसल्या ठिकाणी गेलो होतो -- दचकू नका -- आपल्याला वरनं दिसतं तेवढंच काही सगळयांचं आयुष्य चाललेलं नसतं -- हे तुम्हाला तर माहिती असणारच ! परिपक्व बुध्दीचे ना तुम्ही ! मित्र मजा म्हणून जरी गेले असले तरी मी मात्र ट्रायल म्हणून गेलो होतो. अर्थात एड्स् होवू नये यासाठी योग्य ती काळजी घेऊन ! तर तिथं ती मुलगी म्हणाली की हे -- माझं हे -- फार लहान आहे -- डॉक्टर म्हणतात की या लहानमोठं असण्याचं काहीच महत्त्व नसतं या प्रकारात, पण मला तिच्या तसं बोलण्याचा शॉक बसला असावा -- त्यामुळंही हे असं झालं असेल – हा दोष जन्मजातही असू शकतो – पण काहीही असले तरी मुळात हे असं होण्याचा कमकुवतपणा असणारच नं माझ्यात -- तुमच्याकडून बहाल झालेला ! -- कसं करायचं आता याचं सार्थक ? माझी एकूण वाढ आणि वागणूक यांतही कमतरता आहेत -- मला पुरुषत्वाचा अनुभव आलेलाच नाही --

वसंतराव : असल्या प्रश्नावर अॅक्युपंक्चरची ट्रीटमेंट उपयोगी पडते असं मी वाचलं होतं --

अनंत : तुम्ही सांगाल ते तर मी मुळीच करणार नाही -- आणि माझे निर्णय अंमलात आणायला मी सुरुवातही केलेली आहे -- चर्चेचा विषय न होता मला जगता आलंच पाहिजे -- कुठल्याही नॉर्मल माणसासारखं --

वसंतराव : हे बघ, सगळ्या गोष्टींना मीच जबाबदार असं काहीतरी डोक्यात घेऊ नकोस -- अशी जर कारण- परंपरा बघायची झाली तर आख्खं देवकुळे घराणं खणून काढावं लागेल – आणि तरीही जबाबदारी फिक्स होईल की नाही ती शंकाच आहे -- मीही असा का आहे, याचीही कारणं असतीलच नं ! आणि तू काही सगळ्या विषयांतला तज्ञ नाहीस ! तुझ्या मनानं तू काही ठरवलंस तर त्याला कोण काय करणार ? तर जे काय आहे ते नीट करायचा -- बरं करायचा प्रयत्न करणं शहाणपणाचं होईल --

अनंत : यात आता तुमच्या विचाराची काही गरज नाही --

वसंतराव : कुठं होतास पाच दिवस ?

अनंत : तेच सांगतोय मी तुम्हाला -- मी माझे निर्णय घेतलेत आणि ते अंमलातही आणायला सुरुवात केली

आहे --

वसंतराव : म्हणजे ?

अनंत : म्हणजे माझं लग्न झालेलं आहे ! त्यासाठीच मी बेपत्ता झालो होतो. माझी बायको थोड्याच वेळात इथं येईल. तुम्हा लोकांना एकदम धक्का बसू नये म्हणून मी तिला बरोबर आणलं नाही. शिवाय शक्य तो बाहेरच्या कुणासमोर नको म्हणून मुद्दाम मी तिला उशिरा यायला सांगितलं आहे.

वसंतराव : आता याच्यावर मी चिडायचं की तुझ्या प्रश्नात तुला मदत करायची ? नाव काय तिचं ? तू जे बोलतोयस ते तिला माहीत आहे ? लग्नाला कशी काय तयार झाली ती ? आणि लग्न करणं हा तुझ्या प्रश्नावर उपाय कसा ? तू जे करशील त्याच्याबरोबर सगळे फरफटत आले पाहिजेत का ?

अनंत : हो. विशेषत: तुम्ही ! तुम्ही माझे शत्रू आहात अशा पध्दतीनं मी माझं पुढचं आयुष्य जगणार आहे ! माझ्या दु:खाचं मला दिसणारं कारण तुम्हीच आहात ! बरोबर-चूक गेलं उडत ! आणि तुमचा हळवा स्वभाव, ढोंगबाजी आणि मनाचा मोठेपणा दाखवायची सवय -- यांमुळं तुम्ही माझ्याशी फार वाईट वागू शकणार नाही. त्यामुळं, एक प्रेमळ, आदरणीय शत्रू असं माझ्या आयुष्यात तुमचं स्थान असेल. तुम्हाला विश्वासात कसं घेणार ? माझी ढोंगबाजी मी कशी करायची, हे मी ठरवलेलं आहे -- तुम्ही ही परिस्थिती हाताळायचा प्रयत्न करू नका. फरफटत येण्याशिवाय तुम्हाला गत्यंतरच नाही. तुम्हाला तुमची आणि कुटुंबाची प्रतिमा जपायची आहे आणि मला माझी ! -- हे फक्त स्वच्छपणे लक्षात घ्या !

वसंतराव : सध्या मी तुझं कोणतंच बोलणं अंतिम धरून चालत नाही. बोल तू .

अनंत : आणि कशाही प्रकारे बोलून तुम्ही मला खिशात घालायचा प्रयत्न करू नका. ते जमणार नाही.

वसंतराव : मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं तरी तू देणार आहेस की नाही ?

अनंत : हो. ती द्यावीच लागतील. कारण आपल्या मनाविरुध्द काय, कसं घडतंय हे तर तुम्हाला माहीत असायलाच हवं. निशा जनार्दन वढावकर हे तिचं नाव. वयानं माझ्या एवढीच आहे. मेडिकलची विद्यार्थिनी होती. इथे हॉस्टेलवर राहात होती. तेव्हा तिला हळूहळू अनैतिक संबंधांची चटक लागत गेली. पैसे चांगले मिळतात हे लक्षात आलं. उपाय सगळे माहीत असल्यानं प्रश्नच नव्हता. आता स्वत:च्या फ्लॅटमधे ती राहते. शिक्षण कधीच सोडलेलं आहे.

वसंतराव : घरचं कुणी ?

अनंत : त्यांनी संबंध तोडलेले आहेत. समाजात मानानं जगणारी माणसं आहेत ती ! तुमच्यासारखी ! पण मला तिचा मानानं जगायला उपयोग होणार आहे .

वसंतराव : ते कसं ?

अनंत : तिला मी माझा प्राब्लेम सांगितलेला आहे. तिला माझ्याबद्दल सहानुभूती आहे. आमच्यात जो

समजुतीचा करार झालेला आहे तो असा आहे -- आम्ही लग्न करायचं, तिनं तिचं वागणं बदलायची गरज नाही, नंतर, तिचं वागणं चांगलं नाही -- ती बदफैली आणि विश्वासघातकी आहे या मुद्यावर मी तिच्याशी घटस्फोट घ्यायचा आणि तिनं याला सहकार्य द्यायचं. म्हणजे मग पुढं या धक्क्यामुळं मी दुसरं लग्न केलं नाही -- अशा समाजाला पटणाऱ्या दु:खात मला नॉर्मल आयुष्य जगता येईल.

वसंतराव : आणि यात तिनं विश्वासघात केला तर ?

अनंत : ते होणार नाही कारण माझा तिला उपयोग नाही. त्यामुळं ती ठरल्याप्रमाणे विश्वासघातानं वागेलच. लग्नाआधी दहा हजार आणि घटस्फोटानंतर दहा हजार असा सरळ आर्थिक व्यवहार आहे. पहिले दहा हजार मी तिला दिलेले आहेत. आता फक्त आपल्या संबंधित लोकांत जी काय थोडीफार खळबळ होईल ती तुम्ही हाताळून शांत करायची -- बास !

वसंतराव : आणि तू लग्नच करायचं नाही, असं ठरवलं असतंस तर ?

अनंत : शक्य झालं असतं ते ? मी एकटाच मुलगा, नोकरी आहे, परिस्थिती चांगली ! घरच्यांसकट सगळ्यांनी लग्नासाठी डोकं खाल्लं असतं माझं ! आणि सगळ्यांना हे कारण कसं सांगणार ? त्यांचा अपेक्षाभंग कशामुळं होतोय हे त्यांना कळलंच नसतं ! त्यापेक्षा माझा निर्णय त्यांना थोडाफार समर्थनीय वाटला म्हणजे त्यांचं, विशेषत: घरच्यांचं दु:ख सुसह्य होईल. नाहीतर धोका असा होता की सगळ्यांच्या आग्रहाला मी बळी पडल्यामुळं एखादी चांगली मुलगी मला गळ्यात बांधून घ्यावी लागली असती. आणि मला कुणाच्या आयुष्याचं मातेरं करायचं नव्हतं. आता हे सगळं ठरल्याप्रमाणे होईपर्यंत चारसहा महिनेच फक्त जरा त्रास होईल, पण पुढं कटकट राहणार नाही.

वसंतराव : या मुलीशी कशी ओळख झाली ?

अनंत : कशी झाली असेल ?

वसंतराव : म्हणजे याच्याहून कमी हानिकारक, कमी धोकादायक असं काही शक्यच नव्हतं असं आम्ही धरून चालायचं !

अनंत : हो.

वसंतराव : आणि तुला जो शारीरिक प्रश्न वाटतोय त्याबद्दल काही प्रयत्न शक्य असतील तर ?

अनंत : शक्य नाहीत. आणि त्यात मला तुमची मदत नको आहे. आणि आत्ताच्या आत्ता सगळा प्रश्न आवाक्यात घ्यायचा प्रयत्न करत बसू नका. खरं तर नंतरही करू नका. तुम्हाला एवढी आणि इतपत माहिती पुरेशी आहे. ही तरी तुम्हाला का दिली -- तर, मनात असो नसो, माझी ही योजना पूर्ण करायला तुम्ही सहकार्य द्यायचं आहे. घरात इतर कुणाला याचे जास्त धक्के बसू नयेत याची तुम्ही काळजी घ्यालच. माणसं हँडल करायचं तुमचं कसब वापरा ! आणि तुम्ही हे करालच कारण समाजात

मानानं जगायचा तुमचा अट्टाहास आहे. माझाही तोच अट्टाहास आहे. दोघंही आवश्यक ते ढोंग करू आणि मानानं जगू !

वसंतराव : तू असा माझ्याशी कधी धमकीच्या भाषेत बोलशील असं वाटलं नव्हतं.

अनंत : काय होणं शक्य आहे, हे फक्त मी बोललो. मी म्हणतोय तसं तुम्ही वागला नाहीत तर आपोआप काय होईल, हे तुमच्याही लक्षात येऊ शकेल. संभाव्य तमाशा, बदनामी टाळा एवढंच म्हणतोय मी. आता याच्याहून जास्त काही बोलायला वेळ नाही. ती आल्यावर घरातल्या लोकांना अचानक काही घडल्यासारखं वाटू नये यासाठी आजीला आणि आईला बोलावून घेऊन त्यांना पुरेशी माहिती तुम्ही देऊ शकता. म्हणजे द्या.

वसंतराव : तू काय मला आज्ञा देतोयस ?

अनंत : परिस्थितीच अशी आहे की मला आज्ञा देणं भाग आहे आणि तुम्हाला ती पाळणं भाग आहे. मझं वय आता अठ्ठावीस आहे. लग्नाच्या संकटाची वेळ जवळ आलेली आहे. आजपर्यंत उभ्या केलेल्या,जपलेल्या माझ्या प्रतिमेची मोडतोड होण्याचं हे संकट आहे ! म्हणजे मृत्यूचंच संकट ! हे परतवण्यासाठी मला आटोकाट प्रयत्न करणं भागच आहे. तुम्हाला त्रास होणारच.

वसंतराव : सक्ती होतेय ही --

अनंत : तुम्हाला मी शत्रू मानत असलो तरी तुम्ही माझे प्रेमळ वडील आहात. मला दु:ख होऊ नये ही तुमची इच्छा असणारच ! तिचा मी फायदा घेणार आहे. आणि माझ्या लग्नाबद्दल अती आतुरता बाळगणं या पापाबद्दल आजी आणि आई यांनाही थोडीफार शिक्षा मिळणारच नं ! ( काही क्षण जातात. वसंतराव क्षणभर अनंतकडे पाहतात, मग उजव्या दाराकडे जातात.)

वसंतराव : शिल्पा ऽ , आईला घेऊन बाहेर ये. ( त्या दोघी येतात. सावधपणे आणि उत्सुकतेने. ) हं, बसा. ( त्या बसतात. अधीर. ) आता मी काय सांगतोय ते नीट ऐका. मी थोडक्यात सांगणार आहे. जास्त प्रश्न विचारायचे नाहीत. जे काय आहे ते आहे. कळतंय का ? ( त्या नुसत्या ऐकताहेत ). अनंतानं लग्न केलेलं आहे. आणि त्याची बायको आत्ता थोड्या वेळात इथं येतीय. रात्रीचे साडेअकरा झालेत. आता ती कधीही इथं येईल. तिचं सध्या तरी स्वागत करा.

आई : मुलगी कुठली आहे ?

वसंतराव : काहीही विचारायचं नाही. दुसरं एक. ( इथं अगदी मंद, सौम्य मलूलपणे सनई सुरू होते.) आपण आनंदानं वागतोय का दु:खानं वागतोय हे कळून वागायची आपल्याला सवय असते. या बाबतीत तसं होणार नाही. म्हणजे होता कामा नये. आनंदानं किंवा दु:खानं असं वागणं होता कामा नये.आज तरी. याचा अर्थ तुटकपणा दाखवायचा असा नाही. साधं,थोडंसं कर्तव्य भावनेनं वागा पण मन:स्थिती तिचं स्वागत करण्यायोग्य ठेवा. कळतंय का ? ( त्या मूढपणे पाहताहेत.) याहून जास्त माहिती मिळवायचा

प्रयत्न करू नका. मिळणार नाही. आणि सध्या आवश्यकताही नाही. आपण या घरात आल्याचा इथल्या लोकांना फार आनंद झालाय असं तिला वाटायला नकोय, पण त्याचबरोबर, आपण इथं आलेलं कुणाला आवडलेलं दिसत नाही, असंही तिला वाटायला नकोय. आणि आता ती येईपर्यंत स्वस्थ राहा. यावर फारसा विचार करत बसू नका -- हे असंच आणि एवढंच व्हायला हवंय. कळलं ? ( काही क्षणांनी ते बसतात. सनई चालूच. ) संगीता काय करतीय ?

शिल्पाताई: उद्या तिला पहाटे लौकर उठायचंय म्हणून झोपली ती --

वसंतराव : हं -- ( क्षणभरानं त्या दोघींकडे पाहून जरा जोरात --) असे मूढ चेहरे करून बसू नका, नीट वागा -- ( त्या जरा दचकतात, एकमेकींकडे पाहतात. चेहरे जरा रिलॅक्स करायचा प्रयत्न करतात.)

आई : ( काही क्षणांनी, शिल्पाताईंना --) दोन निरांजनं, ओवाळून टाकायला एक तुकडा आणि पायांवर घालायला दूध आणि पाणी तेवढं तयार ठेव. काय कळायचं ते नंतर कळेल पण कितीही झालं तरी या घराची सून म्हणून येतेय ती ! ( शिल्पाताई उठतात. सावकाशपणे अनंताकडे पाहतात. तो त्रयस्थासारखा बसून. आत जातात. प्रकाश हळूहळू मंद होत जातो तसतसा सनईचा आवाज वाढत जातो. नुसती नोमथोम. असे काही क्षण जातात. पुन्हा सावकाशपणे प्रकाश वाढत जातो तसतसा सनईचा आवाज कमी होत जातो. पण सनई चालूच राहते. आता समोर चौघेही पेकाळून बसलेले आहेत. शिल्पाताईंना सोफ्यावर बसल्याबसल्या झोप लागली आहे. वसंतराव समोर एकटक पाहात बसून. आई, वसंतरावांकडे पाहात बसून. काही क्षण असे जातात. मग बाहेर आवाज येतो म्हणून अनंत खिडकीतून बाहेर पाहतो.)

अनंत : ती आलीय. ( वसंतराव उभे राहतात. आईकडे पाहतात. आई लगबगीने शिल्पाताईंना जाग्या करतात. )

आई : ( शिल्पाताईंना --) ए,आलीय ती ! ऊठ ! ( शिल्पाताई उठतात. केस नीट करतात. साडी नीट करतात. वसंतरावांकडे पाहतात. वसंतराव दुसरीकडे पाहतात. शिल्पाताई आत जाऊन ओवाळण्यासाठी तयार केलेले तबक घेऊन येतात. निरांजने लावलेली. तोपर्यंत निशा आणि एक तरुण दाराशी आलेले. आई पुढे होतात --) थांब, थांब ! ओवाळल्यावर मगच आत यायचं ! शिल्पाताई पुढे होतात. दारात निशा आणि तो तरुण उभे. थबकतात.)

शिल्पाताई: अनंता, तू ये ! ( तरुणाला --) तुम्ही जरा बाजूला होता ? ( तरुण स्मित करत उभा. )

तरुण : अच्छा निशा ! चल ने दो अब तुम्हारा घरेलू मामला ! मी चलतो, अच्छा !

निशा : बाय ! ( तो जातो. निशा सस्मित. )

अनंत : आई, त्याची काही आवश्यकता नाहीय.या असल्या जुन्या गोष्टींवर कुणाचा विश्वास राहिलेला नाही ! ये निशा, आत ये ! ( निशा आत येते. फॅशनेबल पोषाख, शिल्पाताई तबक हातात धरून उभ्या. )

निशा : आय ॲम व्हेरी सॉरी ! साडेबारा वाजून गेले. मला जरा जास्तच उशीर झाला. ( अनंताला --) ए, मी उद्या सकाळी सगळ्यांची ओळख करून घेतली तर चालेल का -- मी थकलेय फार -- अं -- आपली खोली कुठाय ?

अनंत : तुला फ्रेश व्हायचंय ?

निशा : नाही, तेवढंही त्राण नाही माझ्यात. चल -- ( सगळ्यांकडे पाहून-- ) आय ॲम रिअली सॉरी ।

( ती दोघं डाव्या हाताच्या दारातून त्यांच्या खोलीकडे जातात. तिघेही वेड्यासारखे उभे. एकमेकांकडे पाहताहेत. वसंतराव नजर फिरवतात. शिल्पाताईंचे डोळे भरून आलेले. आई त्यांच्याजवळ जातात. पाठीवर हात ठेवतात. त्याही हुंदका दाबताहेत--)

आई : ( शिल्पाताईंना --) चल - ( त्या दोघी हळूहळू उजव्या दारातून आत जातात.वसंतराव विमनस्कपणे उभे. अंधार होत जातो. सनई चालूच. हळूहळू अस्पष्ट होत बंद होते. काही क्षणांनंतर वसंतराव व्यंकटेशस्तोत्र पुटपुटत असल्याचा आवाज :-

प्रत्यक्ष प्रकटेल वनमाळी । त्रैलोक्य भजत त्रिकाळी ।
ध्याती योगी आणि चंद्रमौळी । शेषाद्रीपर्वतीं उभा असे ।।
देवीदास विनवी श्रोतयां चतुरां ! प्रार्थनाशतक पठण करा ।
जावया मोक्षाचिया मंदिरा । कांहीं न लागती सायास ।।
एकाग्रचित्तें एकांती । अनुष्ठान कीजे मध्यरातीं ।
बैसोनियां स्वस्थचित्तीं । प्रत्यक्ष मूर्ति प्रकटेल ।।
तेथे देहभावासी नुरे ठाव । अवघा चतुर्भुज देव ।
त्याचे चरणी ठेवोनि भाव । वरप्रसाद मागावा ।।
इति श्रीदेवीदासविरचितं श्रीव्यंकटेशस्त्रोत्रं संपूर्णम्
।। श्री व्यंकटेशार्पणमस्तु ।।
जय गणेशा, जय व्यंकटेशा, जय महादेवा,
जय सप्तश्रृंगी माता । जय सर्व संतनकी जय ।।

-- हे चालू असताना मधेच प्रकाश पडत जातो. देवघरातून उदबत्तीचा धूर येतो आहे. जरा वेळ समोर कुणीही नाही. नंतर उजव्या समोरच्या दारातून आई येतात. अंघोळ झालेल्या. स्वच्छ, शुभ्र. पण चेहऱ्यावर थकवा. येऊन सावकाश बसतात. बसताना ‘ परमेश्वरा ‘ म्हणतात. नंतर संगीता येते. तीही अंघोळ झालेली. हातात पुस्तक. बसते..)

आई : (काही क्षणांनी -- संगीताला -- हलक्या आवाजात --) अनंताचं लग्न झालंय. त्याची बायको आलीय

काल..

संगीता : सांगितलंन मावशीनं -- झोपलीय का अजून ? म्हणून अनंता गेला होता म्हणजे ! कशी आहे ?

आई : जास्त काही विचारू नकोस. बघ तूच थोड्या वेळानं. पण जास्त बोलू नकोस काही. ती बोलली तर बोल.

संगीता : मग आता लोकांना रिसेप्शन वगैरे ठेवावं लागेल नं ?

आई अजून काही ठरलेलं नाही. काल तर आलीय. ( अजून खालच्या आवाजात--) रात्री साडेबारानंतर आली !

संगीता : झोपला कधी मग तुम्ही ?

आई : काही विचारू नकोस. वेड लागायची पाळी आलीय. अनंता असा नव्हता कधी. कशी काय त्याला ही मुलगी आवडली कळत नाही. काय एकेक प्रसंग येतायत वसंतावर ! तो म्हणून बिचारा सहन करतोय ! परमेश्वरा, शक्ती दे रे बाबा त्याला !

संगीता : तुम्हाला आवडलेली नाही दिसत --

आई : अगं बोलू नकोस बये असलं काही -- मी काहीतरी बोललेय का असलं ? (... काही क्षणांनी शिल्पाताई येतात. त्या अर्थातच स्वयंपाकघरातून आलेल्या आहेत. सावकाशपणे येऊन बसतात. रोजच्या दिनक्रमाप्रमाणे अंघोळ वगैरे झालेली आहे पण चेहरा खचलेला. )

शिल्पाताई : नाकीडोळी नीट आहे. थकून आली होती. उशीर खूप झाला होता.

आई : पण ओवाळून घेणं नाही, देवाला, मोठ्यांना नमस्कार करणं नाही -- मला काही हे आवडलं नाही.

शिल्पाताई : हे काही साधं सरळ दिसत नाहीय. त्यामुळं एरवीसारखं नकोच काही बोलायला --

संगीता : ए, ती आली --( निशा सस्मित येते. हिचीही अंघोळ झालेली.)

निशा : नमस्कार सगळ्यांना ! खरं म्हणजे मी एवढ्या लवकर उठत नाही. अनंतनं रिक्वेस्ट केली की निदान पहिल्या दिवशी तरी या घराच्या पध्दतीप्रमाणे वाग. म्हणून उठून अंघोळबिंघोळ करून घेतली. मी पूर्वीची निशा जनार्दन वढावकर. कालपासून निशा अनंत देवकुळे. ही संगीता, या आई आणि या आजी -- मला माहीत आहे. बाबा पूजा करतायत वाटतं. कशी काय वाटतेय मी तुम्हाला ?

शिल्पाताई : छान आहेस.

आई : अनंताची निवड चुकायची नाही.

निशा : ( संगीताला --) तू काय करतेयस ?

संगीता : मी इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगच्या दुसऱ्या वर्षाला आहे.

निशा : मस्त ! ( देवघरात मंत्रपुष्प. ) मी जरा इथला फोन नंबर देऊन ठेवलाय हं काही ठिकाणी. माझा फोन आला तर प्लीज सांगा मला.

शिल्पाताई: सांगू.

निशा : सकाळच्या वेळी हे असलं ऐकायला मस्त वाटतं. एक तर मी इतक्या लौकर कधी उठत नाही आणि हे असं कधी फारसं ऐकलेलंही नाही. हेही शेवटचंच बहुतेक. याच्यानंतर काय असतं ?

शिल्पाताई: तीर्थप्रसाद असतो.

निशा : नाही, ते ठीक आहे. त्याच्यानंतर म्हणतेय मी -- ( फोनची रिंग वाजते. संगीता उठते.' हॅलो ' म्हणत फोन घेते. तिचा चेहरा विचित्र होतो. )

संगीता : निशावहिनीचा फोन. ( निशा जाऊन फोन घेते. )

निशा : ( फोनवर -- ) हॅलो ! हो. निशाच बोलतेय. नाही,. ती दुसरी आमच्या घरातली मुलगी होती. ( हसून --) हो. नव्या घरी आलेय. हो, शादी केलीय. नाही, नाही, काही प्रॉब्लेम नाही ! तसं काहीच नाही. ( वसंतराव तुळशीला पाणी टाकायला निघालेले --) प्रीतम लॉज नं -- हं ! ओ.के. येईन मी. डोंट वरी. नाही रे, तसं काही नाही. नंतर सांगीन मी. हो. बिझिनेसच. जरा वेगळं आहे पण. ठीक. अच्छा ! ( खळखळून हसते. फोन ठेवते. पुन्हा येऊन जागेवर बसते. वसंतराव जाऊन तुळशीला पाणी घालून येतात. देवघरात जाऊन तीर्थप्रसाद आणतात. आई, शिल्पाताई,निशा आणि संगीता अशा क्रमाने देतात. नंतर पुन्हा देवघरात जाऊन भांडी ठेवून येतात. नंतर सोवळे बदलण्यासाठी उजव्या दारातून आत जातात.)

शिल्पाताई: हे जास्त बोलत नाहीत घरात. ते समोर असताना आम्हीसुध्दा जास्त बोलत नाही.

निशा : ते येतंय लक्षात. मी देवाला नमस्कार करून येते. ( उठते आणि थेट देवघरात जाते. )

आई : अगं, थांब म्हणावं तिला, मग एवढा वेळ सोवळ्यात पूजा करून काय उपयोग ?

शिल्पाताई: काही बोलू नका.

आई : होय बाई. ( काही क्षणांनी --) वसंतानं पूजा जरा आवरतीच घेतलेली दिसतेय आज.

शिल्पाताई: ( काही क्षणांनी, संगीताला --) फोन कुणाचा होता ?

संगीता : ते कळलं नाही पण ' निशाजान ' म्हणत होता.

शिल्पाताई: निशाजान ? !

आई : म्हणजे काय ?

शिल्पाताई: काही नाही. ( वसंतराव कपडे बदलून येतात. पँट, शर्ट. शर्टची बटणे लावत येतात. त्यांना देवघरात निशा दिसते.)

वसंतराव : बाहेरून नमस्कार करायचा असं सांगता नाही आलं कुणाला ? ( याच वेळी अंघोळ वगैरे आटोपलेला अनंत आलेला आहे.)

अनंत : ( निशा देवघरात असल्याचं पाहून --) काही बिघडत नाही आत गेली तर. मुळात शंभर फोटो आणि

दोनशे मूर्तींची पूजा करत बसणं हाच महामूर्खपणा आहे. फालतू अवडंबर नुसतं ! ( निशा बाहेर येते.)

वसंतराव : ( क्षणभर पाहून, दुर्लक्ष करायचं ठरवून मग शिल्पाताईंना --) चला -- मी डबा घेऊन जाणार आहे. ऑफीसात जेवेन मी. ( शिल्पाताई उठून आत जातात. वसंतरावही जातात. निशा येऊन बसते. )

निशा : छान वाटतं ! मी रोज गणपतीच्या फोटोला नमस्कार करते.

संगीता : ( निशाला -- ) ए, मी जाऊ अभ्यासाला ?

निशा : हो, जा नं ! ( वसंतराव ब्रीफकेस घेऊन येतात. मोजे, बूट घालू लागतात. मग शिल्पाताई डबा घेऊन येतात. त्यांच्याजवळ डबा ठेवून उभ्या राहतात. वसंतराव डबा ब्रीफकेसमधे ठेवून उभे राहतात.)

वसंतराव : ( जाताजाता शिल्पाताईंना -- ) आज आपला फोन काढून न्यायला माणसं येतील, नेऊ द्या -- (जातात.)

अनंत : महाढोंगी ! सोवळंओवळंवाले ! कूळ, जाती, धर्म आणि कर्मकांड यांचे अभिमान व्यर्थ आहेत असं सांगणाऱ्या संतांची महती गात हे त्याच गोष्टींची जोपासना करतात ! दुटप्पी !.

आई : ( उठत --) तू काय बोलतोयस ते मला तर काही कळत नाही बाबा -- ( हळूहळू जातात. )

शिल्पाताई: मी बघते जरा स्वयंपाकघरात. कधी जेवणार असाल तेव्हा सांगा. ( जातात. )

निशा : कशाला बोअर करत होतास ? टेक इट ईझी ! जे जगायला मिळतंय तेच जगायचं !( अनंत काही न बोलता बसतो.) आता तुमच्या या वातावरणात मी येणं ही एक विचित्र गोष्ट आहे. आणि माझ्या आयुष्यातलंही सगळंच मला आवडतं असं थोडंच आहे ! पण कुणीही झालं तरी मागे कुठे फिरणार ?

अनंत : बरं, एक लक्षात घे. शेवटी तू मला फसवलंस असं व्हायला हवंय. तुझा बाजार उघड दिसत राहिला तर माझा साळसूदपणा खोटा पडेल.

निशा : ओ.के. काळजी घेईन मी. मी तुला प्रेमात फशी पाडलं आणि तुझ्या सरळ स्वभावाचा फायदा घेतला – असाच शेवटी सारांश निघेल. डोंट वरी.

अनंत : नरदेहाचं सार्थक करा म्हणतात भडवे ! अनुभव, आठवणी, विचार, भावना आणि हे शरीर ! -- हे सगळं मिळून -- नरदेह ! -- मी ऋणी राहीन तुझा !

निशा : अरे छोडो ! इट इज बिझनेस यार ! ( अंधार होतो. नंतर काही क्षणांनी ' इम्तिहान ' मधले ' रोज शाम आती थी ' हे गाणे चालू होते. प्रकाश पडतो तेव्हा ट्रान्झिस्टरवर हे गाणे चालू असल्याचे दिसते. आता समोर फोन नाही. संगीता एकटी गाणे ऐकत सोफ्यावर पडून वाचते आहे. काही क्षणांनी बेल वाजते. ती ट्रान्झिस्टर बंद करून दार उघडायला जाते. दार उघडते. दारात, सुरुवातीला निशाबरोबर आलेला तरुण ).

तरुण : निशा आहे का ?

संगीता : नाहीय.

तरुण : कुठं गेलीय ?

संगीता : माहीत नाही.

तरुण : येईल का एवढ्यात ?

संगीता : माहीत नाही.

तरुण : नाही तर नाही. जाऊ दे. तू चल. तू तर तिच्यापेक्षा मस्त आहेस !

संगीता : अं ?

तरुण : ( तिचा हात धरून --) चल बेबी । मौज करेंगे !

संगीता : ( हाताला हिसडा देऊन हात सोडवून घेऊन मोठ्या आवाजात --) काय बडबडताय तुम्ही -- चालते व्हा इथून -- ( मोठ्याने--) आजी ऽ , अहो आजी ऽऽ

तरुण : ( पुन्हा तिचा हात धरत --) काय नखरे करते, चल !-- ( आई येतात. संगीता पुन्हा हाताला हिसडे देते आहे. आईही घाईने पुढे येतात. ‘ ए ऽ ए ऽऽ ’ करत मधे पडतात. तरुण बाजूला होतो. ) देख लूंगा मै तुझे ! नखरे करते साली !( तिच्याकडे एक संतापाचा कटाक्ष टाकतो आणि जातो. संगीता जाऊन धाडकन् दार लावते. येऊन सोफ्यावर अंग टाकते आणि हुंदके देऊन रडू लागते.)

आई : काय झालं ? कोण होता तो ?

संगीता : निशा वहिनीकडे आला होता.

आई : काय म्हणत होता ?

संगीता : मला त्याच्याबरोबर चल म्हणत होता ...( मोठ्यांदा हमसून हमसून रडत राहते. आई तिच्याजवळ बसतात. काही क्षण असेच जातात.)... इथं नाही राहू शकणार मी आता ... इथं नाही राहू शकणार ...( हुंदका आणि बोलणं एकत्र --) हा कोर्स सोडून द्यावा लागणार मला ... सगळा खर्च केलेला फुकट सजाणार ...( जोरात रडत -- ) जगण्यातच काय अर्थ राहिला मग ...( रडत राहते...)

आई : अगं, असं काही होत नाही -- उगीच काहीतरी टोकाचे विचार करू नकोस -- तुझी जबाबदारी आम्ही घेतलीय ना सगळ्यांनी -- तू कशाला विचार करतेस --

संगीता : बघून घेईन म्हणाला तो -- गुंड असणार तो -- म्हणजे कधी ना कधी त्रास देणारच तो --

आई : असं काही होत नाही -- इथं काय मोगलाई आहे काय ! कुणाला जगताच येणार नाही मग --

संगीता : ॲसिड टाकतात ते तोंडावर --

आई : अगं, क्वचित कुठंतरी घडलं असेल ते -- सर्रास सगळीकडे घडतं का --

संगीता : मी आता इथे राहणार नाही -- काही नको मला -- मी नोकरी करून झालेला खर्च भरून काढीन --

आई : किती विचार हे तुझे संगीता ! आम्ही काहीतरी विचार करू की नाही ! सध्या तू काहीच ठरवू नकोस. सगळे आल्यावर विचार करून ठरवू आपण.

संगीता : माझं नशीबच घाणेरडं आहे -- काही गरज होती का असलं काही घडायची ! उगीचच नको त्या माणसाशी शत्रुत्व आलं !

आई : अगं, पळून जाताना त्यालाही काहीतरी म्हणायला हवंच की नाही -- म्हणून म्हणाला असेल तो -- प्रत्येक ठिकाणी असा शेवट गाठून त्यांना तरी जगता येईल का --

संगीता : मी आता आईबाबांना पत्र लिहून टाकते -- मी नाही राहू शकणार इथं -- ( हुंदके देत राहते...आई थोपटत राहतात...)

आई : ( स्वत:शीच --) काय मांडलंयस रे बाबा परमेश्वरा हे ! आम्ही तुझ्या पायाशी शरण आलेली माणसं आहोत बाबा ! लौकर एकदाचं नीट कर बाबा सगळं ! ...( अंधार होतो. पुन्हा प्रकाश पडण्यापूर्वी शिल्पाताईंचे संवाद सुरू होतात. प्रकाश पडतो तेव्हा समोर शिल्पाताई, अनंत, निशा आणि वसंतराव. शिल्पाताईंचे बोलणे तसेच चालू ...)

शिल्पाताई: काय चाललंय हे अनंता ! आम्ही घरातली जिवंत माणसं आहोत की पुतळे आहोत नुसते लाकडाचे ! काय घडतंय हे सगळं ? कोण आहे ही मुलगी ? आज मला हे सगळं कळलं पाहिजे -- मी गप्प बसणार नाही -- काहीच माहीत नसताना -- असं अंधारात वागता येणार नाही आम्हाला... नुसतं एकमेकांच्या दडपणांखाली गप्प बसून कसं राहता येईल आम्हाला -- आणि घरात ही सून म्हणून आलीय तर तिची आम्हाला माहिती नको ? आणि या घरातली एक व्यक्ती म्हणून वागतेय का ती ? का नाही ? आज हा संगीताचा प्रसंग घडला ! त्या पोरीनं काही भलतंसलतं ठरवलं म्हणजे सगळं आयुष्य धोक्यात येईल तिचं ! कोण जबाबदार याला ? -- आणि तुमची काय अपेक्षा आहे की तोंड दाबून आम्ही हे सगळं बघत बसावं ? अंगात ताप भरलाय तिच्या -- काही नुकसान झालं तर ? -- आणि घरी कुणी लोकं येतात जातात की नाही ? त्यांना काय सांगायचं आम्ही ? ही जाते कुठे, हिचे नातेवाईक कोण, कुठे आहेत -- आम्हाला काही सांगायची गरज वाटत नाही तुम्हाला ? समजता काय तुम्ही ?

वसंतराव : हं ! पुरे आता ! खूप झालं ! एक लक्षातच घ्यावं लागेल की एका विशिष्ट परिस्थितीत त्यानं हे लग्न केलेलं आहे -- वेगळं आहे हे -- नेहमीसारख्या अपेक्षा ठेवता येणार नाहीत ! लक्षात घ्या हे ! थोड्या दुरुस्त्या आवश्यक आहेत हे खरं आहे. अनंता, योग्य तेवढी पुरेशी माहिती तू द्यायला हवीस आणि निशानं जरा समजुतीनं राह्यला हवं. वातावरण बिघडवू नका. मुख्य म्हणजे हा संगीताचा प्रश्न मिटवला पाहिजे. तिची भीती घालवली पाहिजे. तिनं घरी पत्रबित्र पाठवलं तर घोटाळे होतील.

निशा : एवढं काही नाहीय याच्यात. मिटून जाईल.

अनंत : निशा तू बोल संगीताशी. तिच्या मनातली भीती गेली नाही तर माझ्या मनात भीती जमा व्हायला

लागेल !

निशा : निश्चिंत राहा तुम्ही सगळे. हे मी पाहीन. संगीताशीही बोलेन मी --

शिल्पाताई: अनंता, तू मुलगा आहेस माझा -- शत्रू नाहीस. तुझ्या अशा वागण्याचं काहीतरी कारण असेलच. तू उगीचच वेडंवाकडं वागणार नाहीस. पण खरं सांग, या लग्नाला आम्ही विरोधच करू, असं वाटलं तुला ? स्वत:च्याच आवडीनिवडी, अपेक्षा आम्ही धरून बसू असं वाटलं ? तसं नको समजूस. आणि निशानंही थोडं वागणं बदललं आणि घरातल्या माणसांत ती रुळली तर ठीक आहे सगळं. आमची काहीच तक्रार नाही.

निशा : नात्याची माणसं आणि एकमेकांची मनं सांभाळणं यातून मी गेली काही वर्षं बाहेर आहे. मला या कटकटी नको आहेत.

शिल्पाताई : मग लग्नच कशाला केलंस तू ?

निशा : ते तुम्ही तुमच्या मुलाला विचारा. मला दुरुस्त करायच्या फंदात तुम्ही पडू नये हे बरं !

शिल्पाताई: तो पहिल्या दिवशी तुझ्याबरोबर आलेला माणूस कोण होता ? तुला निशाजान म्हणून फोन करणारा कोण होता ? आणि हा संगीताच्या बाबतीतला प्रसंग कुणी केलाय ? एकच आहे ना हा माणूस ? एका घरात राहून लपवाछपवी नकोय !

अनंत : आई, घराचं आणि माझं हित सांभाळायची तुझी जबाबदारी आहे असं समजून तुझं हे सगळं चाललं आहे. पण नेमकं यामुळंच घराचं आणि माझं अहित होईल. आपल्या काही लक्षातच आलेलं नाही असं भोळेपणानं वागणंच सगळ्यांच्या हिताचं आहे. तसं नाही केलं तर माझा हा एवढा मोठा निर्णय फसेल. आणि त्याची ठोकर मला एकट्यालाच बसणार नाही. शिवाय मी माझ्या हिताचं म्हणून जे वागतोय ते तसं सगळ्यांच्याच हिताचं आहे.

शिल्पाताई: हे असलं अर्धवट मला काही कळणार नाही. मग मला समजेल तसं मला वागावं लागेल ! ( त्राग्याने निघून जातात. काही क्षण शांतता. )

वसंतराव: अनंता, तू हे चारसहा महिन्यांचं प्लॅनिंग केलंस खरं, पण घरात इतर माणसंही असणार याचा तू विचार केलेला नाहीस. अशा परिस्थितीत कोण कसं वागेल हा मुद्दा नाही आला तुझ्या विचारात ?

अनंत : ही कल्पना होती मला पण मी ते तसंच रेटून न्यायचं ठरवलं. आणि तसंच नेणार आहे.

निशा : हवं तर मी माझ्या फ्लॅटवर राह्यला जाऊ शकते -- ( अनंताला--) तूही चल -- पण तुला ते सहन होणार नाही.

अनंत : मी तुझ्याशी सरळ, साधं वागत असताना तू वेगळं वागलीस अशी माझी दयनीय, दु:खद परिस्थिती

व्हायला हवीय. मी दु:खी असण्याचं कारण एकदा नीट उभं करता आलं म्हणजे झालं ! मग त्या इतरांच्या सहानुभूतीखाली मला माझा कमकुवतपणा लपवून ठेवता येईल. आहे यात काहीही बदल केले तरी हा हेतू साध्य होणार नाही.

निशा : ठीक आहे. पुन्हा इथं कुणी येणार नाही याची मी काळजी घेईन. फोन काढलेलाच आहे. रूळ बदलताना थोडा खडखड आवाज होणारच.

अनंत : या बाबतीत बाबा, तुम्ही आईला योग्य ते सांगा. चारसहा महिने कसेही निघून जातील !

वसंतराव : मला ते इतकं सोपं वाटत नाही !

अनंत : पण आता माघार घेताच येणार नाही -- आता माघार म्हणजे चर्चा आणि बदनामी !

वसंतराव : मी आता असं करतो -- शिल्पाला एक गोष्ट सांगतो -- ही अशा व्यवसायातली मुलगी आहे. अनंताचं आणि हिचं प्रेम जमलं आणि हिलाही ह्या व्यवसायातून बाहेर पडायचं होतं. यासाठी त्यांनी लग्न करायचं ठरवलं. ही गोष्ट घरात कुणाला पटणं शक्यच नव्हतं -- हे ओळखून त्यांनी त्यांचा निर्णय अंमलात आणून टाकला. आता त्यांना सांभाळून घेणं भाग आहे.

अनंत : हे छान आहे -- आपल्याला उपयुक्त पडणारं त्यांचं वागणं होईल अशी कोणती तरी समजूत त्यांना द्यायला हवीच – खऱ्या-खोट्यांतला फरक मिटवायची कामगिरी आहे ही ! यासाठी सततच कल्पनाशक्ती सळसळती ठेवून वागावं लागेल -- याची तयारी लागणारच !

निशा : मला चालेल -- माझ्याकडे मग रागाऐवजी सहानुभूतीनं बघितलं जाईल --

वसंतराव : अनंता, ही तुझी निर्मितीक्षमता पाहून कुणीही थक्क होईल ! निशा, संगीताला बोलाव. ( निशा जाते. ) संगीताच्या डोक्यात काय चाललंय तेही पाहून घ्यावं लागेल -- ( काही क्षणांनी निशा आणि संगीता येतात.) हं -- बस, संगीता -- ( ती बसते. निशाही बसते.) -- झालेला प्रकार कळलाय आम्हाला -- त्याचा सगळा विचारही केलाय आम्ही -- मुख्य म्हणजे तो माणूस निशाला माहीत आहे -- तीही याबाबतीत योग्य ते करेलच -- तू आता याचा काही विचार करू नकोस --

संगीता : पण त्यानं ॲसिड टाकलं म्हणजे ?

वसंतराव : तसं काही होणार नाही -- आम्ही आहोत ना -- आणि एक लक्षात घे -- इंजिनियर व्हायचं या जिद्दीनं चाललाय ना तुझा प्रयत्न -- मग मधे एखादा अडथळा आला तरी तो पार करायचा, पण जिद्द सोडायची नाही --

संगीता : पण मला भीती वाटते --

वसंतराव : जिद्द टिकवायची ! -- हार मानायची नाही ! -- आणि आम्ही आहोत ना ! -- अं !

संगीता : हं --

वसंतराव : हे काही घरी कळवूबिळवू नकोस -- उगीच त्यांना काळजी लागेल -- किंवा बंदच करतील ते तुझं

शिक्षण !-- अं --

संगीता : हो --

वसंतराव : सगळं शिक्षण सोडून देण्याइतका मोठा बदल करायची काही आवश्यकता नाही -- अं - वेडेपणा होईल तो -- आणि नंतर पस्तावून काही उपयोग होणार नाही -- पटतंय ना ?

संगीता : हो -- पटतंय --

वसंतराव : एखाद्या किरकोळ प्रसंगामुळं एकदम घाबरटपणा आणि मूर्खपणा नको -- अं ?--

संगीता : नाही --

वसंतराव : जा मग आता -- अं -- हा विचार दे सोडून आणि अभ्यासाचं बघ -- आम्ही आहोत -- अं --

संगीता : हो -- ( उठते --)

वसंतराव : पटतंय नं तुला ?

संगीता : हो -- असंच करीन मी -- जाऊ ?

वसंतराव: हं, जा -- ( संगीता जाते. ) केवढा धोका पत्करायला लावतोय आपण तिला ! ' आम्ही आहोत ' म्हणून खरं तर काय उपयोग आहे ?

निशा : तसं वाईट काही होणार नाही --

वसंतराव : असं धरून चालू -- पण धोका पत्करणंच नं हे !

अनंत : हे बघा, तिनंही मनात तुलना केली असेलच. हे शिक्षण सोडून देण्यापेक्षा थोडा धोका पत्करावा, हे तिलाही वाटलं असणारच -- त्यामुळं याची जबाबदारी आपण मानायचं काही कारण नाही --

वसंतराव: मलाही नीट न पटलेलं मी तिला पटवून दिलंय -- म्हटलं तर पापच हे --

अनंत : आणि तिचं शिक्षण नीट पार पडलं तर पुण्य ! -- आपण पुण्यच समोर ठेवायचं !

वसंतराव : यात माझा कुठं तोल जाऊ नये म्हणजे झालं ! ( जातात. )

अनंत : ( निशाला -- ) तुझ्या धंद्याच्या गोष्टी गुप्त ठेवणं आवश्यक आहे --

निशा : ओ.के. काळजी घेईन मी -- मी माझ्या नातेवाईकांकडे जात असते असं काहीतरी सांगू --

अनंत : एखादी खरोखरची संसारी स्त्री आपल्या नवऱ्याला कसं फसवेल तसं व्हायला हवं सगळं -- अं -- करशील ना असंच --

निशा : तुला संशय वाटतो ? डोंट वरी ! मला आता घरच्या सुनेसारखं वागायचं आहे -- मी संगीताकडे जातेय -- ( ती जाते. अनंत बसतो. रिलॅक्स होतो. काही क्षण... मग प्रकाश मंद होता होता मंगळागौरीची आरती सुरू होते -- अंधार होतो -- आरतीचा आवाज मोठा होत जातो तसतसा पडदा पडत जातो.)

**--- अंक पहिला समाप्त ---**

**-- अंक दुसरा --**

पडदा उघडण्यापूर्वी आईंच्या आवाजात

| | | |
|---|---|---|
| ऐसा हा लौकिक कदा राखवेना । | पतितपावना देवराया | ।।१।। |
| संसार करितां म्हणती हा दोषी । | टाकितां आळसी पोट पोसा | ।।२।। |
| आचार करितां म्हणती हा पसारा । | न करितां नरा निंदिताती | ।।३।। |
| संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । | येरा अभाग्यासी ज्ञान नाही | ।।४।। |
| धन नाही त्यासी ठायींचा करंटा । | समर्थासी ताठा लाविताती | ।।५।। |
| बहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ । | न बोलता सकळ म्हणती गर्वी | ।।६।। |

--इथे पडदा उघडत जातो. दृश्य तेच. आई वाचत बसल्या आहेत. सुमारे चार महिने उलटून गेलेले.

पुढे --

| | | |
|---|---|---|
| भेटिसी नवजातां म्हणती हा निष्ठुर । | येतां जातां घर बुडविले | ।।७।। |
| लग्न करू जातां म्हणती हा मातला । | न करिता झाला नपुंसक | ।।८।। |
| निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ । | पातकाचे मूळ पोरवडा | ।।९।। |
| लोक जैसा ओक धरितां धरवेना । | अभक्ता जिरेना संतसंग | ।।१०।। |
| तुका म्हणे आता आइका वचन । | त्यजूनिया जन भक्ति करा | ।।११।। |

-- इथे अनंत येऊन आईंच्या समोर उभा राहतो. त्या पुस्तक मिटवतात.

आई : काय रे ?

अनंत : आजी --

आई : हं, बोल.

अनंत : आजी, आज मी एका महत्त्वाच्या कामाला जाणार आहे. काम होईल की नाही ते सांग.

आई : ( दचकत -- ) काय ? !

अनंत : काम माझं ! होईल की नाही ! ? --

आई: : ( एकदम ओरडायला सुरुवात करतात -- ) वसंता, शिल्पा, इकडे या सगळे. अनंता पुन्हा मला महत्त्वाच्या कामाचं विचारतोय. आता मी फसायची नाही. वसंता ऽ, शिल्पा ऽ ! आता तुला तसलं काहीच करू देणार नाही मी ! ' हो ' म्हणणारच नाही मी आता ! ( वसंतराव, शिल्पाताई येतात. डावीकडून निशाही येते ) हा आज पुन्हा मला विचारतोय. पुन्हा कुठल्यातरी महत्त्वाच्या कामाला चाललाय तो ! होईल की नाही ते विचारतोय मला ! बघ बाबा वसंता, मी वेळीच तुला सावध केलंय ! नंतर मला दोष नको !

वसंतराव : काय अनंता, आता कसलं काम आहे ?

अनंत : तुम्हाला माहीत आहे. माझं लग्न होऊन चार महिने होऊन गेले आहेत.

शिल्पाताई: बरं, मग ?

अनंत : आई, उगीच तुझ्या भाबडेपणानं काही बोलत बसू नकोस -- व्यवहार वेगळा असतो --

शिल्पाताई: तुझ्याकडून शिकते आता व्यवहार !

वसंतराव : तुला काय म्हणायचंय ते येतंय माझ्या लक्षात -- पण --

निशा : मी बोलू का जरा या बाबतीत ?

वसंतराव : बोल, बोल.

आई : महत्त्वाचं काम म्हटल्याबरोबर दचकले मी !

निशा : जे काही काम असेल ते एकदा माझ्याशी बोलून मग ठरवावं एवढंच मला म्हणायचं होतं.

अनंत : तुझ्याशी बोलायचा काय प्रश्न आहे ! जे सगळं बोलून झालेलं आहे तेच आहे सगळं !

निशा : पण जरा एक वेगळा मुद्दा आहे त्यात ! त्यामुळं माझ्या बाजूनं जरा बदल आहेत।

अनंत : म्हणजे ?

शिल्पाताई: चला आई, आपण या घरातल्या कुणी नाही आहोत ! त्यांचं त्यांना बसूं देत बोलत ! काय करायचं ते करू देत ! चला !

आई : महत्त्वाच्या कामाचं म्हणाला म्हणून बोलावलं गं बाई ! ( त्या दोघी जातात. )

अनंत : घटस्फोटाचं कामकाज सुरू करायचंय !

वसंतराव : ठरल्याप्रमाणे बरोबरच आहे ते !

निशा : बाबांसमोर बोलावं की नाही हेच कळत नाहीय मला --

अनंत : बोल, बोल --

निशा : थोडी माझ्याकडून चूक झालीय. चूक म्हणण्यापेक्षा फक्त थोडा बदल घडलाय. इकडे तर घरातल्या लोकांना फार खटकण्यासारखं वाटू नये म्हणून जपायचं आणि त्याच वेळी सगळं नष्ट करायची बीजं पेरत राह्यचं हे व्यवस्थित करत आलेय मी ! चार महिने ! श्रावणातली व्रतंवैकल्यं, मंगळागौरी, सत्यनारायण -- अशा सगळ्या गोष्टींना मी सहकार्य देत आलेय.

वसंतराव : काही काही वेळी तर असा भास झाला की काही प्राब्लेम नाहीच आहे. आणि असंही वाटलं की असंच आभासमय चालू राहिलं तरी काय हरकत आहे ? हे असंच चालू राहिलं तर हा आभास आहे हे विसरूनच जाऊ आपण ! आहे हेच सत्य होऊन जाईल !

निशा : मला थोडंसं तसंच म्हणायचंय ! जरा वेगळं एवढंच ! मला फसवणूक करायचीय असं नाही. मला अधिक पैसे काढायचेत असंही नाही. पण एक गोष्ट तुम्हालाही लक्षात घ्यायला हवीय. या कामासाठी माझ्यावर जेव्हा विश्वास टाकला गेला त्या वेळी मी जी होते तीच तशीच दगडासारखी कायम राहणं शक्यच नाही. मी काही पुतळा नाही. मध्यंतरीच्या काळात मी जिवंतच होते, घटना घडत होत्या, मन काम करतच होतं !

अनंत : इथं मनाचा काय संबंध आहे ? सरळ ठरलेला व्यवहार आहे आणि तो तसा पूर्ण व्हायला हवा. हा व्यवहार पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते ढोंग तुला करावं लागलं आहे इतकंच ! अवघड होतं ते पण ठरवलेलंच होतं तसं ! आणि नाही तरी खूप ढोंग चालू असतं सगळीकडे, त्यामुळं तुला काही विशेष त्रास पडलाय असंही नाही !

वसंतराव : अरे पण बोलू तर दे तिला --

अनंत : यात बोलण्यासारखं आहेच काय ?

वसंतराव: पण --

अनंत : बरं, बोल --

निशा : योग्य वेळ येईपर्यंत कुणाला काही खटकू नये याची मी पूर्ण काळजी घेतलेली आहे. मी कधी आत्याकडे किंवा मावशीकडे गेले तरी या कोण व्यक्ती हे कुणाला माहीत नाही. तेही मला खूप जमवून घ्यावं लागलेलं आहे. सगळ्यांशी मी अपेक्षित पध्दतीनं वागलेली आहे.

अनंत : आभारी आहे, पुढं बोल --

निशा : इतकं सगळं मऊसूत जमेल असं तुलाही वाटलं नसेल. पण हे इतकं जे जमवलंय ते नुसतं ठरलेल्या व्यवहारासाठी नाही. त्याला वेगळं, माझं स्वत:चं, नंतर तयार झालेलं असंही एक कारण आहे.

अनंत : म्हणजे ?

निशा : मी असा विचार केला की आपलं लग्नाचं आयुष्य असं हे पहिलं आणि शेवटचं ! नाहीतरी आपण बरीच शिस्त पाळतोच आहे तर याच काळात --

अनंत : हं -- बोल, बोल --

निशा : याच काळात आपल्याला मातृत्व मिळालं तर किती छान होईल ! एरवी मला कधीही मूल झालं असतं तर ते बिनबापाचं, गल्लीबोळ भटकणारं झालं असतं ! इथं जर मी आई झाले तर माझ्या मुलाला घर मिळेल -- नातेवाईक मिळतील आणि मुख्य म्हणजे त्याला समाजात मानानं जगता येईल !

अनंत : म्हणायचंय काय तुला ?

निशा : दोन महिने होऊन गेलेत ! माझी ही योजना मी अंमलात आणलेली आहे ! तुमचा या बाबतीत सल्ला-विचार घेतला नाही कारण विरोधच झाला असता ! निर्णय अंमलात आणून मी बोलतेय कारण आता याला विरोध करणं म्हणजे बेअब्रू, अपमान -- हे तुम्हाला समजेलच याची खात्री आहे !

अनंत : तू गैरफायदा घेतेयस --

निशा : तसंच काही नाही. यात फक्त घटस्फोटाची आपली योजना थोडी पुढं ढकलावी लागेल इतकंच ! पण होणारं मूल हे तुझंच समजलं जाणार असल्यामुळं तुला मूळ योजनेपेक्षा अधिक मानानं जगता येईल. देवकुळे घराणंही पुढं चालू राहील ! घराण्याच्या या देवांची पूजा करत राह्यला पुढच्या पिढीत कुणी नको ? ! आपली मूळ योजना, तुला पुढं मानानं जगता येण्याची होती -- त्यात काहीही बदल मी करत नाहीय -- यात फक्त मी आणखी एकाची -- जन्माला येणाऱ्या एका जीवाची -- किंबहुना तुझ्याच मुलाचीही मानानं जगायची सोय करतेय इतकंच ! काही हरकत ?

अनंत : असा काहीही बदल करण्यापूर्वी तू मला विश्वासात घ्यायला हवं होतंस --

वसंतराव : तुझी योजना अंमलात आणताना तू घेतलं होतंस आम्हाला विश्वासात ?

अनंत : मी मुलगा आहे तुमचा.

वसंतराव ती बायको आहे तुझी !

निशा : असलं मानानं जगायला मी फारसं महत्त्व देत नाही, पण माझं मूल उकिरडे फुंकत फिरण्यापेक्षा घरात राहील, शिकेल, देवधर्म करील, मानानं जगून यशस्वी होईल -- असा मी विचार केला.

अनंत : पण हे मूल मला स्वीकारता येणार नाही. ( निशा हसते. ) हसू नकोस -- मला नकोय हे --

निशा : का ?

अनंत : घटस्फोट विश्वासघातामुळं घ्यायचाय ! मग साहजिकच हे मूल तरी माझं कशावरून असा प्रश्न येईल ! म्हणजे मूर्ख, हास्यास्पद ठरणार मी !

निशा : तसं होऊ नये म्हणून आपल्याला काळजी घेता येईल -- आणि तुला असं अपमानित जगावं लागणं हे माझ्या मुलाच्या दृष्टीनं तरी चांगलं कसं होईल ? मीही तसं होऊ देणार नाही.

अनंत : पण ही जबरदस्ती करणारी तू कोण ?

वसंतराव : तुझी बायको !

निशा : होय, तुझी बायको !! सध्या तरी तुझी मी तीच आहे ! विचार कर --

अनंत : ते काही नाही. ठरल्याप्रमाणे मी तुला वकिलाची नोटीस देऊन टाकतो.

निशा : म्हणजे माझ्या मुलाची तुला फिकीर नाही. मग मी तुझी फिकीर का करू ? वस्तुतः तुझा विश्वासघात करायची माझी इच्छा नाही. मी फक्त ही योजना थोडी पुढं ढकलूया एवढंच म्हणतेय.

वसंतराव : थोडक्यात म्हणजे अजून काही महिने हे आहे असं चालवणं भाग आहे. नो चॉईस.

अनंत : असं काही नाही. हिच्या वागण्याचे काही पुरावे माझ्याकडे आहेत. अजूनही ही तशीच वागत राहील. हिनं सहकार्य नाही दिलं तरी सिध्द करता येईल.

निशा : म्हणजे खरोखरच्या नवराबायकोतली केस करायची ! पण तशी मी निर्लज्ज आहे. माझ्या शेपटीवर पाय दिल्यावर माझं तोंड कोण धरू शकेल ?! मी सगळी ही ठरवलेली योजनाच उघडी करून टाकीन !

अनंत : ठार मारीन मी तुला ! ( संतापलेला. )

निशा : इतकं विचारपूर्वक आपली प्रतिमा सांभाळणाऱ्या माणसाला शोभत नाही हे असलं संतापणं ! अशानं तर प्रतिमा गटारातच जाईल तुझी !

वसंतराव : अनंता, नको, इतकं नको व्हायला !

निशा : पण तुला मी एक सांगते. या काळात मी अगदी शिस्तबध्द राहणार आहे. इतके महिने हे का वाट बघत राहिले असं तुम्हाला कुणी म्हणणार नाही याची मी पूर्ण काळजी घेईन. मुलाच्या जन्मानंतरच मी योग्य ती कारणं तयार करीन घटस्फोटासाठी -- प्रॉमिस ! किंवा वकिलाच्या सल्ल्यानं दुसरंही एखादं कारण काढता येईल.

वसंतराव : मला वाटतं अनंता, तिचे फासे तिनं एकदम परफेक्ट टाकलेले आहेत. तू आता हलू शकत नाहीस. त्यामुळं तिच्यावर मनापासून प्रेम करणं आणि मुलाच्या जन्माच्या आनंदाला तयार राहणं याशिवाय तुला गत्यंतरच नाही. परिस्थिती पूर्णपणे तिच्या हातात आहे आणि अशा वेळी ती फायदा घेणारच ! इतकं नियमाला धरून निर्बुध्द आंधळयासारखं कुणी वागत नसतं ! आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याचं रहस्य हेच आहे ! हा तर वागणुकीचा सनातन मार्गच आहे !

अनंत : मी संधीची वाट पाहीन --

निशा : वाट पाहा तू -- पण अशी संधी मिळणारच नाही तुला --

वसंतराव : निशा, तुझ्या या सगळ्या योजनेत एक कच्चा दुवा राहिला आहे -- सांगू का ? ( अनंत पाहतो. )

निशा : सांगा.

वसंतराव : आत्ता तुझ्या म्हणण्याप्रमाणे झालं तरी घटस्फोटानंतर तू तुझं मूल अनंताच्याच ताब्यात देणार !

निशा : समाजाच्या दृष्टीनं ते त्याचंच मूल असणार, त्यामुळं मला काहीच धोका वाटत नाही.

वसंतराव : त्यापेक्षा मी काय म्हणतो, होणाऱ्या मुलाचा विचार करून ही घटस्फोटाची योजना रद्दच केली तर ?। आई न् बाप दोन्ही मिळतील त्याला !

निशा : इतकी नमकहरामी माझ्या डोक्यात नाही ! आणि मला ते जमणारही नाही. तर सध्या हे एवढं पुरे. तुम्हाला जाणीव दिसत नाही, पण आज संगीताचा वाढदिवस आहे. स्वैपाकात काही गोडधोड करणं चालू आहे. त्यात विक्षेप आणू नका. तिनं जिद्द धरली आणि ती गप्प बसली म्हणून आपल्या सगळ्या योजना टिकून आहेत ! नाहीतर सगळंच बरखास्त झालं असतं ! तिला जरी माहीत नसलं तरी अंमलात येणाऱ्या आपल्या कुठल्याही योजनेची खरी शिल्पकार तीच आहे ! तिचा वाढदिवस छान साजरा झाला पाहिजे !

अनंत : आईला आणि आजीला, आपण आत्ता कशाबद्दल बोलत होतो म्हणून सांगशील ?

निशा : माझ्या वडिलांच्या मालमत्तेमधला माझ्या नावचा हिस्सा कसा काढून घेता येईल हा विचार तुझ्या डोक्यात चाललाय असं सांगीन ! ( जाते. )

वसंतराव : ( काही क्षणांनी -- ) अनंता, जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीच्या पूर्णपणे हातात सापडलोय, हे आपल्या लक्षात येतं ना तेव्हा त्रागा करून, वैतागून काही उपयोग नसतो ! शांत राहणंच ठीक असतं ! मी तुझ्या हातात सापडल्यावर कसा वागतोय ते बघ !

अनंत : शांत राहून तरी उपयोग काय ?

वसंतराव : परिस्थितीत बदल होतो. असा बदल झाला की समोरच्या व्यक्तीची आपल्यावरची पकड ढिली होते. जशी तुझी माझ्यावरची झालीय !

अनंत : बरं, त्यामुळं काय होईल ?

वसंतराव : आता माझंही मत हळूहळू महत्त्वाचं होईल !

अनंत : काय म्हणणं आहे तुमचं ?

वसंतराव : पैशाची भूक, शरीराची भूक आणि मातृत्वाची भूक या तीन गोष्टी तिच्यापुढे आहेत ! मातृत्वाला ती जास्त महत्त्व देऊ शकली तर घटस्फोटाचं रद्दच करावं ! सगळं सोप्पं होऊन जाईल !

अनंत : मला माझ्या वैगुण्याची सतत जाणीव होत राहील असं आयुष्य मला नको आहे -- घटस्फोट व्हायलाच पाहिजे --

वसंतराव : नाहीतरी आता मुलाचा जन्म होईपर्यंतचा काळ मिळणारच आहे -- तोपर्यंत चांगल्या ट्रीटमेंटनं ते वैगुण्य जाऊही शकेल --

अनंत : मी इतका भिकारडेपणा करणार नाही -- जे ठरलंय त्यापेक्षा जास्त मला तिच्याकडून काही नकोय

-- तसले उपकार मी घेणारच नाही -- आणि ट्रीटमेंटचं माझं मी बघीन --

वसंतराव: सगळ्यांचा रागराग करायचा तुला कंटाळा येत नाही ?

अनंत : आपोआप जे चाललंय ते चाललंय !

वसंतराव : बरं पण तिच्या योजनेबद्दल काय करणार आहेस तू ?

अनंत : मला कॉर्नर केलं तरी मी तिचा खून करू शकणार नाही असं गृहीत धरलंय तिनं --

वसंतराव : ' गृहीत धरलेलं ' नाही, ' ओळखलंय ' !

अनंत : तिचा खून केला तर माझं वैगुण्यही उघडं पडणार नाही आणि तिचं गलिच्छ वागणं हे खुनाचं कारण कळल्यावर मला लोकांची सहानुभूतीही मिळेल !

वसंतराव : माझं म्हणणं वेगळं आहे -- कशाला उगीच तिथं शिक्षा भोगत तुरुंगात जाऊन पडतोस -- कशाला सुखाचा जीव दु:खात घालतोस -- आहे असं चालण्यात तसा फारसा धोकाही नाही --

अनंत : सगळे निरनिराळ्या मन:स्थितींचे खेळ आहेत -- माणसं नाहीतच -- आभास नुसते ! – भिकारडे !

वसंतराव : आपल्या मन:स्थितीचं बघायचं -- बास !

अनंत : मी वेडसरपणानं वागायला सुरुवात करतो -- एका वेड्याच्या हाती मूल सोपवण्यात मग तिला धोका वाटेल --

वसंतराव : तिला ना आगा ना पिछा -- ना लाज ना लज्जा ! तिच्या मनाप्रमाणे झालं नाही तर ती संतापून नुसता विध्वंस करून जाईल !

अनंत : ( वैतागून -- ) च्यायला, आभासमय असलं तरी सगळं खरं धरूनच चालावं लागणार ! --

वसंतराव : एकदा जाळं नीट टाकलं की जाळ्यात अडकलेला कायकाय हालचाली करेल याचा तपशीलवार विचार करायची गरज नसते. सध्या तू फारसं काही करू शकत नाहीस. शांत रहा.

अनंत : ठीक आहे. गप्प बसतो मी सध्या. पण तसा गप्प बसणार नाही मी -- ( विचारात उभा. वसंतराव त्याच्याकडे पाहताहेत. अंधार होतो. नंतर निशाच्या आवाजात मीराबाईचे भजन --' गोविंद लीलो मोल ' सुरू होते. काही क्षण. मग प्रकाश पडत जातो. निशा भजन म्हणते आहे. शेजारी संगीता बसलेली आहे. आई, उजव्या समोरच्या दारातून येऊन ऐकत उभ्या राहतात. चेहऱ्यावर प्रसन्न भाव. निशा तल्लीन. सर्वजण अगदी रंगून गेलेले. भजन संपल्यावर आई आनंदाने पुढे येतात. निशाच्या केसांवरून हात फिरवतात. )

आई : छान ! अगदी तल्लीन व्हायला झालं ! ( मग देव्हाऱ्यापुढे जाऊन --) असाच आनंद टिकू दे रे बाबा !

संगीता : खरंच ! काय छान म्हटलंस तू भजन ! ( शिल्पाताई येतात. )

शिल्पाताई: जरा पडले होते. पडल्यापडल्या मीही ऐकलं निशाचं भजन ! खरंच सुंदर ! हा तिचा गुण माहीतच

नव्हता आपल्याला ! कुठं शिकलीस तू ?

निशा : शिकलेबिकले काही नाही -- असंच ऐकून ऐकून -- कॉलेजात असताना म्हणायची मी --

शिल्पाताई : छान !

संगीता: : ( जरा खाजगी आवाजात --) ए मावशी, कालपासून एक गोष्ट सांगावी की नाही ते मी विचार करतेय -- पण आता आपणच आहोत फक्त, तर सांगू का ? पण मी सांगितलं असं कुठं बोलायचं नाही --

शिल्पाताई: हं सांग ! नाही बोलणार !

संगीता : काल संध्याकाळी, माझं पुस्तक इथं राह्यलं म्हणून घ्यायला मी आले होते. त्यावेळी अनंतदादा इथं सोफ्यावर झोपला होता. तो झोपेत विव्हळत होता म्हणून मी थांबले. तर नंतर तो झोपेत बरळायला लागला --' मी खून करीन -- खून करीन मी --' असं ! मग गप्प बसला. असं काय होतंय गं त्याला ?

शिल्पाताई: तू सांगितलंस ते बरं झालं ! पण आपण घरातले अज्ञ पामर जीव आहोत ! समजून घ्यायचाही आपल्याला अधिकार नाही आणि मदत करायचाही नाही ! परके, उपरे आहोत आपण !

निशा : असं नका म्हणू आई ! हे फार दु:खाचं वाटतं मला ! पण सगळं नीट होईल ! विश्वास ठेवा तुम्ही माझ्यावर !

आई : ( निशाला -- ) मग तुला तरी सांगून टाकायला काय होतंय ? आम्हाला उगीचच काळजीत ठेवण्यात काय अर्थ आहे ?

शिल्पाताई: संगीता, तू जा तुझ्या अभ्यासाला --

संगीता : हं -- ( जाते. )

शिल्पाताई: सांग, काय चाललीय तुमची धुसफूस ?

निशा : धुसफूस असं काही नाही. एवढ्या लौकर मूल होऊ द्यायला नको असं त्याचं म्हणणं -- आणि मला ते पटत नाही --

शिल्पाताई: खोटं बोलतेयस -- हेही कारण एक असेल अलिकडचं पण हे वातावरण तर आधीपासूनचं आहे ! तुमचं लग्न झालं तेव्हापासूनचं !

निशा : माझी तर तुम्हाला बऱ्यापैकी माहिती आहेच आता ! त्यातले काही प्रश्न तुम्हाला सांगण्यासारखे नाहीत -- त्याबद्दल चालतं कधीकधी आमचं बोलणं -- बाबांचेही विचार घेतो आम्ही --

शिल्पाताई: मिटणार कधी हे प्रश्न ?

निशा : सगळं ठीक होईल -- विशेषत: मी बाळंत झाल्यावर ! पण याला काही महिने जावे लागणारच नं ! निसर्ग आहे हा !

आई : मग खुनाचं काय बडबडतो अनंता झोपेत ?

निशा : आता त्याच्या स्वप्नातलं मला काय माहीत ?

शिल्पाताई: ठीक आहे -- जेव्हा तुम्हाला काही सांगावंसं वाटेल तेव्हा आणि वाटलं तर सांगा -- मदतच होईल आमची ! -- एरवी आम्ही परमेश्वरावर विश्वास ठेवून जगत आलेली माणसं आहोत ! आणि तेच ठीकही आहे !

निशा : रागावलात ? ( अनंत ऑफीसमधून येतो. )

शिल्पाताई: रागवायचं काय त्यात ?

अनंत : उगीच तिला छेडत बसू नका सगळे -- एकमेकांची डोकी खायची पध्दतच पडत चाललीय घरात --

शिल्पाताई: काही छेडत नाहीय बाबा कुणी कुणाला ! ( जातात. )

आई : अनंता, तू आपलं शांत राहात जा बाबा ! मला बाकी काही नको ! परमेश्वर करेल ते खरं ! ( असं म्हणत जातात. )

अनंत : हे असं खोटं वातावरण फार दिवस चालवणं फार अवघड आहे ! सक्ती होतेय ही !

निशा : तू यात, तुझ्या मनाविरुध्द होतंय -- एवढी एकच गोष्ट लक्षात घेतोयस -- पण याचबरोबर आई आणि आजी यांना आनंद किती होणार आहे हेही लक्षात घे । यालाही महत्त्व दे । आणि मुळात लग्न करतानाही त्यांची तुझ्या लग्नाबद्दलची आतुरता हे एक कारण होतंच ! म्हणजे त्यांच्याही मनांचं महत्त्व आहेच तुला !

अनंत : माझ्या मनाचं काय करू ? गैरफायदा घेणं आहे हे सगळं -- ( जातो. काही क्षण असेच जातात. मग निशा उजवीकडे जाऊ लागते. तेवढ्यात समोरच्या खिडकीत पहिल्या अंकात आलेला तरुण. ‘ ए निशा, ए निशा -- ‘ अशी तो हलक्या आवाजात हाक मारतो. निशा पाहते. लगबगीनं खिडकीजवळ जाते.)

निशा : तू इथं येऊ नकोस म्हणून मी तुला सांगितलं होतं -- का आलास --

तरुण : याद येते ना तुझी !

निशा : विसर आता --

तरुण : माझ्याजवळ तुझे न् माझे एकत्र फोटो आहेत --

निशा : हे चांगलं नाही --

तरुण : तू भेटत नाहीस हे चांगलं आहे ?

निशा : आपली जुनी दोस्ती लक्षात घे --

तरुण : ते जाऊ दे आता सगळं -- इथं न येण्याची आणि गप्प बसण्याची किंमत ठरव --

निशा : बोल --

तरुण : दरमहा एक हजार ! --

निशा : कबूल. तुला दरमहा पोचत राहतील पैसे. जा आता --

तरुण : थँक यू ! -- ( जातो. अनंत बाहेर आलेला. निशा खिडकीत कुणाशीतरी बोलत असलेली त्याला दिसते. )

अनंत : कोण होतं ?

निशा : ब्लॅकमेलर ! इथं न येण्याचे आणि गप्प बसण्याचे दरमहा एक हजार कबूल केले ! देशील ना तेवढे ! प्लीज ! हवं तर माझे उरलेले यातच ॲडजस्ट करू !

अनंत : किती चालणार हे असं ? आपल्या घटस्फोटानंतरही तो येऊ शकेल इथं !

निशा : सध्या मी बाकी काही विचारच करत नाहीय ! मुलाला जन्म देणं हे एकच ध्येय माझ्यासमोर आहे ! पण जाताना मी कुठलाही प्रश्न शिल्लक ठेवून जाणार नाही -- हे नक्की !

अनंत : तू मोकळी होईपर्यंत सगळे बांधलेले राहणार हाच याचा अर्थ !

निशा : पण तुला जसं हवं तसंच घडेल शेवटी !

अनंत : मुलगा किंवा मुलगी झाल्यावर ती एक नवी व्यक्ती येणार या प्रकारात, डिझाईन बदलणार -- तेव्हा आणखी काही वेगळा विचार केलास तर मात्र याद राख ! तुझं असं ताणत जाणं मग तुटल्याशिवाय राहणार नाही --

निशा : तुझी भीती निराधार आहे ! ( जाते. काही क्षण असेच जातात. मग एकदम अंधार होतो. अंधार होताक्षणीच ' राम जन्मला गं सखी राम जन्मला ' हे गीत मोठ्या आवाजात सुरू होते. काही क्षण खूप मोठ्या आवाजात हे गीत चालू राहते. मग बायकांचे हसण्याचे आवाज. तसंच -- ' अगदी अनंतासारखा दिसतोय ', ' नाक आजीसारखं आहे,' ' त्याच्यासाठी चाललंय सगळं, पण त्याला काही आहे का बघा त्याचं ! झोपलाय मस्त !'-- ही स्त्रियांच्या आवाजातली वाक्यं. पुन्हा गीत. मग मधेच -- ' नाव त्याच्या पणजीच्या आवडीचं ठेवलं -- राघव ! राघव ! राघव ! ' -- ही वाक्यं -- अर्थात स्त्रियांच्याच आवाजात. पुन्हा गीत सुरू. काही क्षणांनी पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा समोर वसंतराव सिगरेट ओढत बसलेले. संध्याकाळ. काही क्षणांनी शिल्पाताई येतात. बसतात.)

शिल्पाताई: कसला विचार करताय ? अनेक संकटांमधून का असेना, चांगलं झालं शेवटी.

वसंतराव : शेवटी ?

शिल्पाताई: हो, मग, आत्तापर्यंतचा हा शेवट चांगलाच आहे ना !

वसंतराव : साखळी असते ही प्रसंगांची. न संपणारी. मधल्याच कुठल्यातरी भागाला शेवट म्हणून समाधानी होण्यात काही अर्थ नाही !

शिल्पाताई: मला वाटतं आपल्या घराला काहीतरी रोग झालाय. कशाचाच आनंद होऊ शकत नाहीय. एवढ्या

अडचणींमधनं इथपर्यंत झालं सगळं, मुलगा झाला, दणक्यात बारसं झालं, छानपैकी ' राघव ' नाव ठेवलं , सगळ्यांचे आशीर्वाद मिळाले त्याला -- याहून चांगलं काय व्हायला हवंय ? मला तर जगण्याचं सार्थक वाटावं असं समाधान झालं ! पण नाही, तुम्ही आणि अनंता दुर्मुखलेलेच ! असे का वागता तुम्ही ? ती निशासुध्दा आनंदानं हसूनखेळून असते सगळ्यांशी !

वसंतराव : तुझ्या कॉम्युटरमधे भरलेला डेटा वेगळा आहे आणि माझ्या कॉम्प्यूटरमधला वेगळा आहे.

शिल्पाताई: असू दे !

वसंतराव : या आनंदात जास्त रममाण होऊ नका. सुखात जास्त बुडालं की नंतर येणाऱ्या दु:खाचा दणका जास्त जोरात बसतो.

शिल्पाताई: पण अशी दु:खाची अपेक्षा का करत राहता तुम्ही ? येईल तेव्हा येऊ दे ना ते ! तेही भोगू !

वसंतराव: आता मला अधांतरी जास्त वेळ बोलता येणार नाही. काही घडलं नाही तर बरंच आहे. पण आता काहीतरी तुला अपेक्षित नसलेलं असं घडण्याची शक्यता आहे ।

शिल्पाताई: का ?

वसंतराव: अनंताच्या डोक्यात काही वेगळे विचार चालू आहेत असं मला वाटतं. नुसतं मनात ठेव.

शिल्पाताई: आता मात्र त्याला चांगलं खडसावावं लागेल ! आपला मुलगा असला म्हणून काय झालं ! उगीचच एखाद्या मुलीला छळायचं कशासाठी ? असं होतं तर लग्न केलंच कशाला ? आता मात्र मी तिच्या बाजूनं उभी राहीन !

वसंतराव : अग पण --

शिल्पाताई: तुम्हीसुध्दा हे बोटचेपं धोरण बंद करा आता. स्वत:चं असं ठाम मत ठरवा काहीतरी ! हेही ठीक --- तेही ठीक -- असली हुशारी घरात काही कामाची नाही !

वसंतराव : ठाम मतं घेऊन फिरणाऱ्यांना त्यामुळं होणाऱ्या नाशाची पर्वा नसते ! एखादं मत बाळगत बसण्यापेक्षा जगणं सुखावह कसं होईल हेच मला महत्त्वाचं वाटतं ! ( अनंत ऑफीसातून येतो. शिल्पाताई उठतात. )

शिल्पाताई: अनंता आलाय -- चहा आणते करून --( शिल्पाताई उजव्या बाजूला आत जातात. अनंत हातातल्या वस्तू ठेवतो, बसतो. कुणी काही बोलत नाही. वसंतराव पुन्हा सिगरेट काढून शिलगावतात. झुरका घेतात..)

अनंत : खूप झालं आता ! आता मला हे सांसारीक वातावरण नकोय !

वसंतराव : सांग तिला ! पण गेल्या काही महिन्यांत आयुष्य इतकं मुलायम झालंय की आता, आधी ठरलेलं असलं तरी, तसं काही घडवणं विक्षिप्तच दिसणार आहे ! ती बिचारी आणि तू खलपुरुष असं होणार आहे --

अनंत : त्याला आता इलाज नाही !

वसंतराव : घरातले लोकही बिथरतील ।

अनंत : ते सगळं सावरू नंतर -- पण आता तुम्ही सांगा तिला --

वसंतराव : मी ?

अनंत : हो -- आता जास्त नादी लागू नकोस म्हणावं --

वसंतराव : आणि ती नीट वागायला आणि इथं राह्यला तयार असेल तर ?

अनंत : म्हणजे तुम्ही मला एकटा पाडताय ! असं करण्याच्या परिणामांचाही विचार करा !

वसंतराव : माझं ऐक, असा टोकाचा -- अतिरेकी विचार करू नकोस -- दुसऱ्यांच्याही जगण्याला महत्त्व दे !

अनंत : अतिरेकीपणा घडला तर त्याला सगळेच जबाबदार असतील ! मी एकटा नाही ! मी सांगतोय तसं करा ! ( शिल्पाताई चहाच्या कपबशा घेऊन येतात. देतात.)

शिल्पाताई: आता कसली खलबतं करताय ? नवा जीव आलाय घरात, त्याच्याशी हसा, बोला,खेळा ! ( कुणी काही बोलत नाही.) मला तर असं वाटतंय की सुखच सहन होत नाही तुम्हाला ।

अनंत : तुझं बरोबर आहे आई, पण दुर्दैवानं तुझ्याशी सगळं बोलणं शक्य नाहीय.

शिल्पाताई: म्हणजे अजून आहेच काहीतरी न बोलण्यासारखं ! मला वाटलं झालं असेल सगळं नीट आता !

अनंत : तसं नाहीय ते !

शिल्पाताई: एक लक्षात ठेव -- ओली बाळंतीण आहे ती ! तिला अजिबात त्रास होता कामा नये ! मुलाला अंगावर पाजायचंय तिला, हे लक्षात घ्या !

अनंत : हं --

शिल्पाताई: किमान माणुसकी तरी ठेवा ! आणि मी सांगते, अशाही परिस्थितीत तुम्ही काही विचित्र वागाल नं तर मी ठामपणे तिच्या बाजूनंच उभी राहीनं ! (जाऊ लागतात... )

अनंत : आई, जरा प्लीज निशाला पाठवून दे -- तिला त्रास होईल असं काही नाहीय -- ( शिल्पाताई जातात.) तिच्या त्रासाचा आपण विचार करायचं काही कारण नाही ! ब्लॅकमेलर ! ठरलेला शब्द मोडताना माझ्या मनाचा कुठं तिनं विचार केला होता ?

वसंतराव : तूही इतरांच्या मनांचा विचार करत नाहीस !

अनंत : ते वेगळं ! मी तिच्याशी तसा वागणार आणि तुमच्याशी असाच वागणार !

वसंतराव : मग हे नाही का -- ढोंग ?

अनंत : आहे ना ! सगळेच जबाबदार आहेत याला !

वसंतराव: म्हणजे सगळ्यांच्या ढोंगाला सगळेच जबाबदार ! वा ! खूप सुधारणा झाली म्हणायची विचारात ! पण तिला ढोंग अलोवड नाही !

अनंत : नाही ! व्यवहार ठरलेला आहे ! माझी नैतिक बाजू पक्की आहे ! ( निशा येते. शांतता. ती उभीच. )

वसंतराव: बस. ( ती बसते. )

अनंत : ( त्र्यंकपणे -- ) आता काय अडचण आहे ?

निशा : काही नाही. मला कुठल्याही परिस्थितीचा फायदा घ्यायची इच्छा नाही. मातृत्व मिळवण्याची ही एक चांगली संधी होती, ती मी घेतली. मुख्य म्हणजे मुलाला चांगलं भवितव्य असलेली संधी ! आता माझं काहीही म्हणणं नाही. ( तिचे डोळे पाणावतात. ) छान गोजिरवाणं बाळ ! माझ्या कुशीत ! त्याचे गाल, त्याचे हात, पाय...किती मऊ... किती नाजूक... या सुखाला मर्यादा नाही... आई झालेय मी... तुमच्यामुळं... आता काही नाही ... कसला लोभही नाही... आणि रागही नाही... वेगवेगळ्या तुकड्यांनी घडल्यासारखं आयुष्य गेलं... त्यातला हा तुमच्या घरातला – सगळ्यांत छान गेला !

अनंत : भावनिक बडबड नकोय. त्यानं पाघळण्यासारखी माझी मन:स्थिती नाही.

निशा : माझा तसा उद्देशही नाही.

अनंत : मग बोल आता.

निशा : आता तुमच्या मनासारखं करा. माझी जायची वेळ आली की मी जाईन. पुन्हा मी तुम्हाला दिसणारही नाही -- हे वचन समजा. नंतर, माझ्या मुलासह तुम्ही सर्वांनी मला विसरून जावं हेच त्याच्याही हिताचं होईल...

अनंत : मग, आता नवीन काही नाही ?

निशा : नाही ! माझं पूर्ण सहकार्य राहील ! काहीही करा !

अनंत : नंतरही काही कटकटी होता कामा नयेत !

निशा : ते माझ्या लक्षात आहे. ( जाते. )

अनंत : घटस्फोटाचं कारण बदलावं लागेल कारण हिचं अनैतिक वागणं हे कारण तापदायक होईल. लोकही म्हणतील की हे अचानक कसं कळलं ? आणि मग हे मूल कुणाचं ?

वसंतराव : ते वकिलांशी चर्चा करून ठरवता येईल तुला. पण त्याच्याहून महत्त्वाचा प्रश्न हा आहे की तू घटस्फोट घेणार आहेस हे शिल्पाला आणि आईला कधी सांगायचं ! आत्ताच सांगितलं तर त्या प्राणपणानं विरोध करणार. आणि अगदी पार घटस्फोट झाल्यावर सांगितलं तर आधी त्या संतापणार हे तर आहेच पण एवढा महत्त्वाचा निर्णय त्यांना विचारात न घेता घेतल्यामुळं त्या दु:खी होणार ! आणि असं करणं अटळच होतं हे त्यांना पटवणार तरी कसं ?

अनंत : कुठल्याही परिस्थितीत त्यांना खरं कारण सांगताच येणार नाही.

वसंतराव : वकिलाशी चर्चा करून एकदा कारण ठरलं की त्याला धरून हळूहळू वातावरण निर्मिती करायला सुरुवात करावी लागेल. तरीही त्या तिची बाजू घेण्याची शक्यता आहेच !

अनंत : कारणं समजून घेण्याबद्दलची त्यांची इच्छा दडपूनच टाकायची ! हे अटळ होतं एवढंच सांगायचं ! सरळपणानं होणारच नाही हे ! कारण, कारण कळणं आणि न कळणं दोन्हीही त्यांना दु:खाचंच आहे ! त्यामुळं या भागाकडे दुर्लक्षच करायचं !

वसंतराव : ठीक आहे -- बघू.

अनंत : जे काय घडेल ते घडेल तेव्हा पाहू ! ( इथे अंधार होतो.' एक परदेसी मेरा दिल ले गया ' सुरू होते. प्रकाश पडत जातो. ते गीत ट्रान्झिस्टरवर चालू असून निशा ऐकत स्वस्थ बसलेली आहे. काही क्षणांनी आई येतात. )

आई : राघव झोपलाय वाटतं ? ( निशा ट्रान्झिस्टर बंद करते. )

निशा : हो. म्हणूनच जरा इकडे येऊन बसले. सारखं तिथं थांबून कंटाळा येतो.

आई : सगळा कौतुकाचा कंटाळा आहे हा ! महत्त्वाची व्यक्ती झालीयस तू आता ! कुलदीपक दिलास !

निशा : तुम्हाला आणि आईंना खूप आनंद झालेला दिसतोच ! संगीतालाही बाळाची मजा वाटते !

आई : त्या दोघांचं दे तू सोडून ! अनंता आणि त्याचा बाप ! मूर्ख आहेत दोघंही !

निशा आजी, एक सांगा, तुमचं आयुष्य जसं जावं असं तुम्हाला वाटलं होतं, तसं गेलं ?

आई : प्रत्येकाचं तसंच जातं ! काय काय होणार आहे याची जणू आधीच कल्पना असल्यासारखं !

निशा : मी तुम्हाला कधी दु:ख देईन असं वाटतं तुम्हाला ?

आई : मला तुझ्याकडून दु:ख हवं असेल तर मिळेल ! आत्ता तरी मला ठाऊक नाही. तुझ्यामाझ्या इच्छेचं काय घेऊन बसलीस, लीला तर सगळी वेगळीच आहे ! असो. शिल्पा गेलीय तिच्या मैत्रिणीकडे जेवायला आणि संगीता गेलीय कालेजात फी भरायला -- तूही पड जा पाहिजे तर --

निशा : सारखी झोपून तर असते मी -- जा तुम्ही -- ( आई जातात. निशा काही क्षण स्वस्थ बसून. नंतर खिडकीत तोच तरुण येतो. )

तरुण : निशा, ए निशा -- ( आवाज तर वाढवता येत नाही --) निशा ऽ -- ( निशाचे लक्ष जाते. क्षणभर त्याच्याकडे पाहते. मग जाऊन दार उघडते. तो दारात येतो, आत येत--) फक्त म्हातारी असेल घरात ! मी अशा संधीची वाटच पाहात होतो. तुझा विचार काय ? दोन महिने माझे पैसे आले नाहीत --

निशा : अरे हो हो, बाळंतीण होते ना मी ! मुलगा झालाय !

तरुण : मग आता तर बोनस द्यावा लागेल !

निशा : तुझाच आहे मुलगा !

तरुण : ही तर फारच खुशीची गोष्ट आहे ! माझी तर आता कायमची सोय झाली !

निशा : तुला आनंद नाही वाटला ?

तरुण : काय फरक पडतो ? आणि मुळात तशी खात्री तरी काय सांगता येते ? पण तू सांगितलेलं माझ्या फायद्याचं आहे म्हणून मी ते खरं धरून चालणार !

निशा : भरोसा ठेव -- आणि हा तुझा मुलगा आता या घरात वाढणार -- तर या घराला आता त्रास देऊ नकोस --

तरूण : जिधरभी आपली जी जी किंमत असेल ती सगळी वसूल करावी माणसानं ! समोरच्या माणसाची कपॅसिटी बघून पैसे मागायचे -- बास ! न झेपणारा बोजा नाही टाकायचा कुणावर !

निशा : तुला माहिती आहे, मी धंदा बंद केलाय.

तरुण : सुरू कर पुन्हा.

निशा : नाही. आता मुलाला वाढवायचंय --

तरुण : तुला आता पैशाची काळजी नाही दिसत ! -- मजाय तुझी ! आणि तू इतकी वेडी कशी काय झालीस सगळं सांगून टाकतेयस मला ? !

निशा : माझ्याबरोबर राह्यचे पैसे द्यायचास तू मला !

तरुण : आता बापानं दिलंय मला हाकलून ! आता तुझी भडवेगिरी करावी लागेल ! नाहीतर मग किंमत तरी घ्यावी लागेल तुझ्याकडून !

निशा : खरं सांगू का तुला, मी हे घर सोडून जाणार आहे. बच्चा इथं राहील. माझी एक विनंती आहे तुला. आज मी तुला जे पैसे देणार आहे ते घेतल्यावर पुन्हा तू इकडे येऊ नकोस --

तरुण : मग काय भूका मरू ? पैसे टाक, चल !

निशा : याच्यात गद्दारीची काही बात नाही -- कबूल केलंय ते देणारच मी ! पैसे जवळ ठेवून वाटच पाहतेय मी तुझी ! मी बाहेर पडत नव्हते म्हणून राहिले !--

तरुण : आण मग ! तेवढ्यात कुणी आलं म्हणजे राह्न जाईल --

निशा : मला काळजी नाही ? तुला इथं बघितल्यावर मला विचारणार नाहीत ? तू माझी एवढी विनंती ऐक. पुन्हा इकडून आशा ठेवणार नाही अशी जबान दे --

तरुण : मी जबान दिली म्हणजे ती अगदी पाळणारच असं वाटतं तुला ?! एवढी मॅड कधी नव्हतीस तू ! शादीनंतर डोकं खराब झालंय तुझं !

निशा : मग ?

तरुण : मगबिग काही नाही. पैसे द्यून टाक !--

निशा : आपल्या जुन्या दोस्तीची याद राख --

तरुण : कसली दोस्ती निशा ? कुठल्या जगात राहतेस तू ?

निशा : नाराज करू नकोस मला ! आणि तू नाराज करशील असं वाटतही नाही मला --

तरुण : भूल आहे तुझी ! अपना अपना जियो -- दूसरेकी मत सोचो ! नाहीतर दुसरे जगतील, आपण मरून जाऊ ! तुला पायजेत ना तसली चांगली माणसं पिक्चरमधे भेटतात ! जाऊन बघ एखादं ! व्यवहार तो व्यवहार ! उगीच डोकं खाऊ नकोस ! पैसे आण ! मला जाऊ दे !

निशा : अच्छा बाबा, थांब ! ( आत जाऊ लागते -- थांबून --) इथली कुठलीही वस्तू उचलायची नाही --

तरुण : पाहिजे तर मी येऊ का तुझ्याबरोबर आत ? ( ती त्याच्याकडे पाहते आणि आत जाते -- उजव्या दारातून. जरा वेळाने बाहेर येते. येताना मुलालाही आणते. )

निशा : हं -- हे घे, दोन हजार. ( तो घेतो. मोजू लागतो.)

तरुण : ( मोजत -- ) आणि या महिन्याचे ?

निशा : नंतर !

तरुण : कधी येऊ ? ( पैसे खिशात ठेवतो.)

निशा : तू यायची गरज नाही. पैसे पोचतील तुला.

तरुण : अच्छा -- मी चलतो --

निशा : ( मुलाला सोफ्यावर ठेवत -- ) स्वत:च्या मुलाकडं बघायचीही इच्छा नाही ?

तरुण : अरे, हो हो, बघू तर ! ( तो मुलाकडे बघण्यासाठी सोफ्याजवळ जाऊन वाकतो. ती चाकू काढते. हातात घट्ट धरते.) असू शकेल हा माझा -- ( इथे ती जीव खाऊन चाकू त्याच्या पाठीत खुपसते. तो ' आऽ आऽ ' करतो. धडपडतो. खाली पडतो. पालथा. मुलगा रडायला लागतो. वेगानं देवाचं/ देवीचं शिल्प उचलते. त्याच्या डोक्यावर ते अनेकदा हाणते. मग ते खाली टाकून देते. तो आता निपचित पडलेला. ती त्याच्या खिशातले पैसे काढून घेते. आत ठेवून येते. मग सोफ्यावर बसते. मुलगा रडतोच आहे. त्याला मांडीवर घेते आणि पाजायला सुरुवात करते. )

निशा : होय -- झालेय मी मॅड -- ( दीर्घश्वास --) मॅड ! ( अतिशय एक्साईटेड. गप्प पाजत राहते. भयाण शांतता. ती स्थिर नजरेनं बसून. काही क्षणांनी संगीता येते. तिची चाहूल लागताच निशा पाहते आणि लगेच पूर्ववत होते. संगीता आत येते आणि सवयीप्रमाणे दार लावते. चपला काढून पुढे येते तेव्हा तिला तो तरुण रक्ताच्या थारोळ्यात मरून पडलेला दिसतो. बाजूला ते शिल्प तसेच पडलेले. ते दृश्य पाहून तिला धक्का बसतो. ती अत्यंत भेदरलेली.)

संगीता : ए ऽ वहिनी ऽ हे ...हे ...

निशा : ओरडू नकोस -- भिऊ नकोस ... ऐक .,. घाबरायचं काहीच कारण नाही ... मेलाय तो ... बघ ... चेहरा बघ ... भिऊ नकोस ... बघ चेहरा ...( संगीता तशीच ...घाबरलेली.. स्वत:चा आवाज फुटू नये म्हणून तोंड दाबून उभी ...) ... बघ, बघ ...घाबरू नकोस ...( संगीता लांबून कडेने फिरते... पाहते अचानक ओळखते ...)

संगीता : तोच ... तोच आहे हा ...

निशा : हो !। ... तोच आहे.. आता तुला घाबरायचं काही कारण नाही... याचीच भीती होती ना तुला ... ॲसिड टाकणारा ...अं... आता काही नाही... भिऊ नकोस ...

संगीता : प -- पण --

निशा : मीच मारलंय त्याला ! ... आता कसलीच भीती नाही ... काहीच नाही ...

संगीता : पुन्हा कसा आला तो ?

निशा : पण मेलाय तो ... आता काहीही प्रॉब्लेम नाही... पण मागं तुझ्या बाबतीत असं काही घडलं होतं असं कुठंही बोलू नकोस ! ... विसरून जा सगळं ... जबाबदारी सगळी माझी आहे ...

संगीता : पण --

निशा : त्यावेळी जिद्द धरलीस ... ऐकलंस ... आता फायदा होईल तुझा ... कारण आता प्रॉब्लेम गेला ...

संगीता : कशासाठी आला होता तो ?...

निशा : ते दे सोडून ... तुझं साध्य तुला मिळणं एवढं एकच काम जगात चालू नसतं ...

संगीता : मी काय करू आता ?

निशा : बाकीचं काय बोलायचं ते आम्ही पाहू... तू आल्यानंतर काय पाहिलंस तेवढंच बोल ... मी तुला आत जायला सांगितलं हे सांग... आत जा -- आजी आहेत -- झोपल्या असतील -- नाहीतर बोलण्यात गुंतवून ठेव त्यांना ... अनंत आणि बाबा आल्यावर पाहू ...

संगीता : ( पुन्हा आजूबाजूने प्रेताकडे पाहून --)... प...पण... तुझं काय ?

निशा : तुला वाटतंय की आता हा माझा प्रॉब्लेम झाला... नाही... माझंही सोल्यूशनच आहे हे ...खूप सोल्यूशन्स एकवटलीयत यात ...

संगीता : ( आत जायला लागते पण थांबून --) बाळाला आत नेऊ ?

निशा : हं -- ( ती बाळाला संगीताकडे देते. संगीता बाळाला घेउन घाईने आत जाते. निशा एकटी बसून. अंधार होत जातो. काही क्षणांनी वसंतरावांच्या आवाजात मंत्रपुष्प सुरू होते. काही महिने उलटून गेले आहेत. प्रकाश पडत जातो तेव्हा देवघरात मंत्रपुष्प चालू आहे आणि समोर आई, शिल्पाताई, अनंत आणि संगीता बसलेले आहेत. संगीता अर्थातच एक पुस्तक वाचते आहे. शिल्पाताईंच्या मांडीवर बाळ.)

आई : ( शिल्पाताईंना --) ती गेली सक्तमजूरी होऊन -- आता पुढं आपल्याला काही नाही ना त्रास --

शिल्पाताई: नसेल. ( मंत्रपुष्प संपते--) -- यांची जी सारखी खलबतं चालायची त्याचा आता विचार केल्यावर

वाटतं की असं काहीतरी भयानक घडणार याची यांना आधी कल्पना असावी. पण हे इथं संपलं की अजून काही घडणार आहे हे मलाही माहीत नाही. ( इथं वसंतराव तुळशीला पाणी घालायला देवघरातून बाहेर येतात. )

वसंतराव : अनंता, तू पॉलिसी बदल आता ! आलोच, तुळशीला पाणी घालून -- (बाहेर जातात, पुन्हा येतात.) पाच वर्षांची शिक्षा आहे म्हणजे आता पाच वर्षं तरी प्रश्न नाही -- ( देवघरात जातात.)

आई : अजून पूजेनंतरचा नमस्कार आवरताच घेतोय वसंता !

वसंतराव : ( तीर्थप्रसाद वाटायला आणतात. आई, शिल्पाताई, अनंत, संगीता या क्रमानं देतात.) ती कोर्टबाजी वगैरे आता अवघड नाही. आणि शिक्षा संपल्यावरसुध्दा ती इथं येईल असं मला वाटत नाही.

शिल्पाताई: राघवला मात्र आई नाही असं झालं -- ( रडू येतं. आवरतात. डोळे पुसतात.)

संगीता : ( तीर्थप्रसाद घेतल्यानंतर --) मी जाऊ ?

शिल्पाताई: हं -- ( ती जाते.)

वसंतराव : ( आई आणि शिल्पाताईंना --) मला याला महत्त्वाचं काही सांगायचं आहे. आणि तुमच्यासमोर सांगण्यासारखं नाहीय ते. ( त्या दोघी उठून जाऊ लागतात. शिल्पाताई जरा रागावलेल्या --) आणि संपत आलाय आता हा प्रकार -- आता फार नाही चालणार असं -- ( त्या जातात.) तर आता घटस्फोटाची कामगिरी सोपी होईल असं मला वाटतं -- याच गुन्ह्याच्या आधारावरही मिळेल बहुतेक घटस्फोट-- वकीलांना विचार -- तुझ्या इच्छेप्रमाणे तुला हवं ते दु:ख तुला मिळालंय -- आता मनातल्या मनात ते आनंदानं साजरं करायला हरकत नाही -- बाहेर दु:खच दाखव. तुझं तिच्यावर मनापासून प्रेम होतं हे विसरू नकोस. एकदोनदा वाटलं तर तुरुंगात जाऊन तिला भेटूनही ये !--तसं केलं तर योग्य होईल का हे आधी वकीलांना विचार ... पण दु:ख दाखव ...म्हणजे त्यातून हा तुझाच मुलगा असल्याचंही प्रस्थापित होत राहील... म्हणजे त्याची शंकाच येऊ नये असं होईल ! त्यामुळं, थोडक्यात म्हणजे 'आंधळा मागतो एक डोळा ! '-- असं हे सगळं झालेलं आहे ! तुला हवं असलेलं सत्य मिळून शिवाय ते गिरवून ठळक झालंय ! मला वाटतं, खूप दिवसांनी, पहिल्यांदाच तुला माझं पटत असेल !

अनंत : पटतंय !-- खूपच रिलीफ वाटतोय ! --

वसंतराव : बाकीचं म्हणजे पोलीसकेसमधे जे जे जसंजसं घालायला लावलं ते सगळं लक्षात ठेवायचं आणि रिपीट करत राह्यचं -- आणि पुढं ट्रीटमेंटनं तुझं वैगुण्य गेलं तर वाटल्यास दुसरं लग्नही करता येईल !-- आणि जरी ही सगळी प्रसंगांची साखळी असली तरी सध्या तरी शेवट गोड झालाय हे मात्र खरं !

अनंत : फक्त राघव मोठा झाल्यावर त्याला काय सांगायचं हेही ठरवून ठेवावं लागेल --

वसंतराव : त्याला एकच सांगायचं -- त्याच्या जन्मानंतर काही दिवसांनी त्याची आई कावीळ होऊन वारली. आणि तू त्याचा बाप आहेस हे तर आपोआप कळणारच त्याला !

अनंत : मी काय जगवतोय कोण जाणे – पण -- ( नाटकीपणाने--) या ! राघव अनंत देवकुळे ! या ! तुमच्या आयुष्याचा भक्कम पाया तयार झालेला आहे ! आता तुम्हाला हवी तशी तुमच्या प्रतिमेची इमारत यावर तुम्ही उभी करू शकता !...( वसंतराव सस्मित पाहताहेत... क्षणभरानं काहीतरी लक्षात आल्याप्रमाणे अनंत वळतो आणि देव्हाऱ्याच्या दिशेनं दंडवत घालतो. वसंतराव सद्गदित होत, आनंद्राश्रू पुसत देव्हाऱ्याकडे पाहतात. हात जोडून उभे राहतात....)

वसंतराव: आता सगळं बरोबर झालेलं आहे ! देवाची कृपा ! ( पडदा पडत जातो...)

**-- दुसरा अंक समाप्त --**

--- 000 ---

**सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

चं. प्र. देशपांडे

फोन -- ९३७१००५७७३.

ईमेल – champrade@gmail.com

संकेतस्थळ – www.champralekhan.com